




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक २७७ * नांदेड * शनिवार, दि. १७ ऑक्टोबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# माहूरगडावरून दर्शन करून परतताना भीषण अपघात; ३ भाविकांचा मृत्यू

- चालकाचा ताबा सुटल्याने अपघात
- पहाटे ५ वाजेच्या सुमारास घडली घटना



**श्रीक्षेत्र माहूर (प्रतिनिधी)–** श्री रेणुका मातेचे दर्शन घेऊन परतणाऱ्या भाविकांच्या टेम्पोला माहूर घाटात भीषण अपघात झाला. चालकाचा ताबा सुटल्याने टेम्पो थेट १०० फूट खोल दरीत कोसळला. या दुर्दैवी घटनेत यवतमाळ येथील ३ भाविकांचा मृत्यू झाला असून, अन्य ३ जण किरकोळ जखमी झाले आहेत. ही घटना शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर रोजी सकाळी ५ वाजेच्या सुमारास घडली.

नवरात्रोत्सवानिमित्त यवतमाळ येथील 'बोरा डिजिटल'चे ६ कामगार एका छोट्या टेम्पोने (क्रमांक एमएच २९ बीई ६८५९) गुरुवारी रात्री माहूरगडावर देवीच्या दर्शनासाठी आले होते. रात्री १२:०० वाजेच्या सुमारास दर्शन आणि कार्यक्रम आटोपल्यानंतर, शुक्रवारी सकाळी ५:०० वाजता ते यवतमाळकडे परत जाण्यासाठी निघाले.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयामागील पहिल्या घातक वळणावर समोरून आलेल्या वाहनाचा प्रकाश चालकाच्या डोळ्यावर पडला. तसेच ते वाहन विरुद्ध दिशेने आल्याने अपघाताचा धोका टाळण्यासाठी चालकाने टेम्पो मोकळ्या जागेत वळवला. मात्र, वळणाच्या किनाऱ्यावर संरक्षक भिंत किंवा कठडे नसल्यामुळे वाहनाचा तोल गेला आणि टेम्पो थेट १०० फूट खोल दरीत कोसळला.

या अपघातात टेम्पोच्या मागील डाल्यात बसलेले तिघे जण बाहेर उसळून दगडावर आदळले, तसेच त्यांच्या अंगावर टेम्पो व दगड पडल्याने गंभीर दुखापत झाली. बाबाराव ज्ञानोबा टेकाम (वय ६०), राहुल सुधाकरराव ठाकरे (वय २५) आणि प्रीतम रामराव प्रधान (वय ३८, सर्व रा. यवतमाळ) यापैकी राहुल ठाकरे व प्रीतम प्रधान यांचा जागीच मृत्यू झाला, तर बाबाराव टेकाम यांचा ग्रामीण रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची माहिती डॉ. बिपिन बाभळे यांनी दिली.

टेम्पोच्या केबिनमध्ये बसलेले चालक प्रतीक अरविंद अडकिने (वय २६), दत्ता मनोहर मेश्राम (वय ३५) आणि यशवंत अरविंद पाटील (वय २५, सर्व रा. यवतमाळ) यांना किरकोळ मार लागल्याने जखमी झाले आहेत.

घटनेची माहिती मिळताच डायल ११२ च्या मदतीने पोलीस निरीक्षक देविदास चोपडे, पोलीस अंमलदार पवन राऊत यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. इलियास बावाणी, गोपाल चव्हाण व स्थानिक नागरिकांच्या मदतीने दरीतून मृतदेह व जखमींना बाहेर काढून ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. शारदा कन्स्ट्रक्शनचे सुपरवायझर श्रीनिवास यांनी क्रेन उपलब्ध करून दिल्याने दरीतील टेम्पो बाहेर काढण्यात आला.

ग्रामीण रुग्णालयात १०८ चे कर्मचारी आणि वैद्यकीय पथकाने तातडीने उपचार व उत्तरीय तपासणी केली. उपविभागीय पोलीस अधिकारी किरणकुमार भोंडवे यांनी घटनास्थळाची पाहणी केली असून, पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि शरद घोडके, सत्यमल मडावी, संघरत्न सोनसळे, पवन राऊत व सहकाऱ्यांचे पथक पुढील तपास करत आहे.

# दिल्लीच्या कॅनॉट प्लेस परिसरात कॉकरोच जनता पक्षाचं तिरंगा फडकवत आंदोलन

## कार्यकर्ते आणि पोलिसांमध्ये मोठी झटापट

**नवी दिल्ली (प्रतिनिध)–** सीजेपीच्या 'लहरा दो तिरंगा' आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर दिल्लीमध्ये मोठा राडा झाल्याचं दिसत आहे. कनॉट प्लेसमधील सेंट्रल पार्ककडे निघालेल्या अभिजीत दिपके यांना दिल्ली पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. सीजेपीच्या आंदोलनाला परवानगी नाही, असं कारण देत दिल्ली पोलिसांनी अभिजीत दिपकेंना ताब्यात घेतलं आहे.

त्या आधी दिल्ली पोलिसांनी अभिजीत दिपके यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांना आंदोलन न करण्याबाबत नोटीस दिली होती. त्यानंतर आंदोलन स्थळी जाताना दिल्ली पोलिसांनी अभिजीत दिपके यांना ताब्यात घेतल्यानं वातावरण चांगलंच तापलं आहे.

कॉकरोच जनता पार्टीचे नेते सौरव दास आणि आशुतोष रांकांच्या अटकेविरोधात पुन्हा एकदा सीजेपी मैदानात उतरली आहे. दिल्लीत आज लहरा दो तिरंगा आंदोलनाची हाक देण्यात आली होती. संध्याकाळी पाच वाजता कनॉट प्लेसमधील सेंट्रल पार्कमध्ये तिंरगा रॅलीसाठी जमण्याचं आवाहन सीजेपीनं केलं होतं. मात्र त्याआधीच कॅनॉट प्लेस आणि आजूबाजूच्या परिसरात निर्बंध लागू करण्यात आले. त्यावर मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमारांना वाचवण्यासाठी पंतप्रधान अवघी दिल्ली ठप्प करत आहेत अशा शब्दांत सीजेपीने भाजपला लक्ष्य केलं.

# राज्यात आता सुट्या मसाल्यांच्या विक्रीवर बंदी

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यात आता सुट्या मसाल्यांच्या विक्रीकर बंदी घालण्यात आल आहे.

खाद्यपदार्थांच्या भेसळ करणाऱ्यांविरोधात दंड थोपटलेल्या अन्न व औषध प्रशासनाचे (एफडीए) आयुक्त तुकाराम मुंढे यांनी आता भेसळयुक्त मसाल्यांची विक्री करणाऱ्यांविरोधात कठोर भूमिका घेतली आहे. मसाल्यांचे उत्पादन, प्रक्रिया, साठवणूक, वाहतूक आणि विक्री या संपूर्ण पुरवठा साखळीमध्ये अन्नसुरक्षेच्या नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आदेश एफडीएने दिले आहेत. हळद, मिरची, धने, जिरे, काळी मिरी, दालचिनी, लवंग, वेलदोडे, हिंग, केशर आणि मिश्र मसाल्यांसह सर्व प्रकारच्या मसाल्यांच्या व्यवसायासाठी हे आदेश लागू करण्यात आले आहेत.

# भरधाव कार थेट बहादरपुरा पुलावरून नदीत कोसळली; पत्नीचा मृत्यू, पती थोडक्यात बचावला

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेडहून कंधारमार्गे मुखेडच्या दिशेने जाणारी कार शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर रोजी पहाटे बहादरपुरा पुलावरून थेट नदीत कोसळल्याची थरारक घटना घडली आहे. या भीषण अपघातातून पोहता येत असल्याने पती सुदैवाने बचावला असून पत्नीचा मात्र मन्याड नदीत बुडून मृत्यू झाला. ही घटना शुक्रवारी मध्यरात्रीनंतर सुमारे २ वाजण्याच्या सुमारास घडली.



प्राथमिक माहितीनुसार, मुखेड तालुक्यातील सावरगाव (पि. वाडी) येथील रहिवासी लक्ष्मण संभाजी गुट्टे (वय ४४) आणि त्यांच्या पत्नी पार्वती लक्ष्मण गुट्टे (वय ४०) हे दाम्पत्य कारने (क्रमांक एमएच २६– सीवाय– २६३५) प्रवास करत होते. बहादरपुरा पुलावरून जात असताना अचानक कारवरील नियंत्रण सुटले आणि कार थेट पुलावरून खाली नदीत कोसळली.

कार पाण्यात पडताच लक्ष्मण गुट्टे यांनी प्रसंगावधान राखत कसेबसे कारबाहेर येऊन स्वतःचा जीव वाचवला. मात्र रात्रीचा मिट्ट काळोख आणि नदीच्या पाण्याचा प्रवाह यामुळे त्यांना पत्नीला बाहेर काढता आले नाही. पाहता पाहता कार पाण्यात पूर्णपणे बुडाली.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक, पोलीस प्रशासन आणि आपत्कालीन बचाव पथकाने घटनास्थळी धाव घेतली. सकाळी क्रेनच्या सहाय्याने अथक प्रयत्नानंतर दुर्घटनाग्रस्त कार नदीतून बाहेर काढण्यात आली आहे. त्यानंतर काही तासाने पार्वती गुट्टे यांचा मृतदेह पाण्याबाहेर काढण्यास यश आले. कंधार उपविभागीय पोलीस अधिकारी सुशील जुमडे व पोलीस निरीक्षक या प्रकरणाचा तपास करत आहेत.

# एमपीएससी परीक्षा पेपरफुटीच्या चौकशीसाठी निवृत्त न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली आयोगाची स्थापना

**मुंबई (प्रतिनिधी)–** एमपीएससी परीक्षांमधील पेपरफुटीच्या आरोपांची चौकशी करण्यासाठी राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमधील गैरप्रकारांच्या चौकशीसाठी निवृत्त न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली आयोगाची स्थापना करण्यासंदर्भात अधिसूचना जारी करण्यात आली आहे.

निवृत्त न्यायमूर्ती दिलीप भोसले चौकशी आयोगाचे अध्यक्ष असणार आहेत. निवृत्त न्यायमूर्ती पी. डी. नाईक यांच्यासह पाच सदस्यांचा आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. तसेच आयुक्त तुकाराम मुंढे, गणेश पाटील आणि लखमी गौतम यांचा आयोगात समावेश असणार आहे.

औषध निरीक्षक, गट-ब, गट-क, कृषी सेवा आणि अभियांत्रिकी सेवांसह एकूण ९ परीक्षांतील गैरप्रकारांची चौकशी करण्यात येणार आहे. प्रश्नपत्रिका, उत्तरतालिका किंवा त्यातील काही भाग फुटल्याच्या आरोपांची चौकशी होणार आहे. एमपीएससीचे विद्यमान आणि माजी अध्यक्ष व सदस्यांच्या भूमिकेचीही तपासणी होणार आहे. दोष सिद्ध झाल्यास संविधानाच्या कलम ३१७ अंतर्गत कारवाईसंदर्भात शिफारस करण्याची जबाबदारी आहे.

**एमपीएससीच्या अध्यक्षपदाचा अतिरिक्त कार्यभार सतीश वाघोले यांच्याकडे**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षांमधील पेपरफुटी आणि गैरप्रकाराच्या मुद्यांवर विद्यार्थ्यांनी आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्यासाठी पुण्यात आंदोलन केलं होतं. विवेक भीमनवार रजेवर असल्यानं त्यांच्या रजेच्या काळात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे सदस्य सतीश बबन वाघोले यांच्याकडे अध्यक्षपदाचा अतिरिक्त कार्यभार दिला आहे. राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्यावतीने हे आदेश जारी करण्यात आले आहेत.

# भेसळखोरांवर एफडीएचा बडगा; नांदेडमध्ये २९ लाख रूपयांचा मसाल्याचा साठा जप्त, ३२ दुकानांवर छापे

**नांदेड (प्रतिनिधी)–** सणासुदीच्या काळात नागरिकांना सुरक्षित व दर्जेदार अन्न मिळावे यासाठी अन्न व औषध प्रशासनाने 'सुरक्षित अन्न, सुरक्षित महाराष्ट्र' ही राज्यव्यापी मोहीम तीव्र केली आहे. नांदेड जिल्ह्यात नवरात्रोत्सवापासून आतापर्यंत ३२ आस्थापनांची तपासणी करून तब्बल २९.१७ लाख रुपयांचा संशयित अन्नसाठा जप्त करण्यात आला आहे.

अन्न सुरक्षा आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या संकल्पनेतून सुरू असलेल्या या मोहिमेत मिरची पूड, हळद पूड, धने पूड आणि मीठ असे एकूण २५ हजार ८३२ किलो पदार्थ भेसळीच्या संशयावरून जप्त करण्यात आले आहेत. त्याची एकूण किंमत २९ लाख १७ हजार १७२ रुपये आहे.

या कारवाईत ५३ अन्न नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवले, त्रुटी आढळलेल्या १३ आस्थापनांना सुधारणा नोटिसा, – विना नोंदणी व्यवसाय करणाऱ्या १ आस्थापनेला तत्काळ व्यवसाय बंद करण्याचे आदेश, नोटीस देऊनही सुधारणा न करणाऱ्या १ आस्थापनेचा परवाना निलंबित, ४ आस्थापनांवर तडजोडीची प्रकरणे दाखल करून २१ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

दरम्यान, माहूरगड येथील शारदीय नवरात्र महोत्सवाच्या पार्श्वभूमीवरही १५ अन्न आस्थापनांची तपासणी करून १६ नमुने घेण्यात आले असून व्यावसायिकांना स्वच्छतेचे नियम पाळण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

ग्राहकांनी परवानाधारक विक्रेत्यांकडूनच खरेदी करावी, पॅकबंद पदार्थांची एक्सपायरी डेट तपासावी. भेसळ आढळल्यास एफडीए नांदेड कार्यालयाशी किंवा FoSCoS पोर्टल / http://complaints.mahafda.in वर तक्रार करावी, असे आवाहन सहायक आयुक्तांनी केले आहे.

# राज्यात खासगी रुग्णालयांचे दर मराठी, इंग्रजीत दर्शनी भागात दर्शविणे बंधनकारक

**मुंबई (प्रतिनिधी)–** खासगी रुग्णालयांमध्ये उपचारांसाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्काबाबत पारदर्शकता आणण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वाचे निर्देश दिले आहेत. रुग्णालयांमधील वैद्यकीय सेवा आणि सुविधांचे दर मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषांमध्ये ठळकपणे दर्शनी भागात प्रदर्शित करणे बंधनकारक करण्यात आले आहे. रुग्णांना उपचारांचा खर्च समजावा आणि शुल्काबाबत संभ्रम निर्माण होऊ नये, या उद्देशाने सार्वजनिक आरोग्य विभागाने १६ ऑक्टोबर रोजी यासंदर्भात शासन परिपत्रक जारी केले.











# बळीराजासाठी आयएएस आणि आयपीएस अधिकाऱ्यांचा पुढाकार

## एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीला

**मुंबई (प्रतिनिधी)–** सध्या राज्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांची उभी पिकं करपू लागली आहेत. पिण्याच्या पाण्याचा जनावरांच्या चाऱ्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर सरकारनं राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला आहे. अशातच एक महत्वाची बातमी समोर आली आहे. राज्यात उद्भवलेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना मदत म्हणून आता राज्यातील सर्व आयपीएस, आयएएस, अधिकाऱ्यांचा पुढाकार घेतला आहे. सर्व अधिकाऱ्यांचे ऑक्टोबर महिन्यातील एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये देणगी म्हणून उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

राज्यातील सर्व आयपीएस, आयएस, अधिकाऱ्यांनी एक मोठा निर्णय घेतला आहे. सर्व अधिकाऱ्यांचे ऑक्टोबर महिन्यातील एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये देणगी देण्याचे ठरले आहे. सर्व अधिकाऱ्यांनी हे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये मदत कार्यासाठी जमा करण्यास इच्छुक असल्याबाबत सरकारला पत्र दिले होते. महाराष्ट्र शासनाने खरीप हंगाम २०२६ मधील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन राज्यातील ३०५ तालुके अंतिमतः दुष्काळग्रस्त घोषित केले आहेत. मदत व पुनर्वसन विभागाने यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील


# अमेरिकेच्या कठोर धोरणाचा भारताला धडा

अमेरिकेतील स्थलांतराचा प्रश्न पुन्हा एकदा राजकारणाच्या केंद्रस्थानी आला आहे. विवेकहिन डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाच्या काळात स्थलांतरविषयक नियम अधिकाधिक कठोर केले जात असताना, त्याचा सर्वाधिक फटका अमेरिकेत काम करणाऱ्या परदेशी कुशल मनुष्यबळाला बसण्याची शक्यता आहे. एच-१ बी व्हिसा, ग्रीन कार्ड आणि विद्यार्थी व्हिसाबाबत यापूर्वीच अनेक निर्बंधात्मक पावले उचलण्यात आली आहेत. आता एच-१बी व्हिसाधारकांना नोकरी गमावल्यानंतर मिळणारा ६० दिवसांचा 'ग्रेस पीरियड' रद्द करण्याचा प्रस्ताव पुढे आला आहे. हा निर्णय केवळ अमेरिकेतील भारतीय व्यावसायिकांसाठीच नव्हे, तर भारताच्या कुशल मनुष्यबळाच्या भवितव्यासाठीही महत्त्वाचा ठरू शकतो. सध्या एच-१ बी व्हिसावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्याची नोकरी गेल्यास त्याला ६० दिवसांचा अवधी मिळतो. या काळात नवीन नोकरी शोधून व्हिसाची स्थिती कायम ठेवण्याची संधी असते. प्रस्ताव मंजूर झाल्यास ही सुरक्षितता संपुष्टात येईल. नोकरी गेली की अमेरिकेत राहण्याचा कायदेशीर आधार तातडीने संपुष्टात येण्याची शक्यता आहे. परिणामी, संबंधित व्यक्तीला अल्पावधीत देश सोडण्याची वेळ येऊ शकते. कागदावर हा बदल केवळ एका नियमातील दुरुस्ती वाटू शकतो; प्रत्यक्षात मात्र त्याचे परिणाम अत्यंत गंभीर असतील. अमेरिकेत अनेक वर्षे स्थायिक झालेल्या भारतीय व्यावसायिकाचा रोजगार अचानक गेला, तर त्याच्यासमोर केवळ नवी नोकरी शोधण्याचे आव्हान नसते. मुलांचे शिक्षण, घर, वाहन, आर्थिक गुंतवणूक, कुटुंबाची व्यवस्था आणि भविष्यातील नियोजन या सर्वच गोष्टी एका झटक्यात विस्कळीत होऊ शकतात. नोकरी गमावल्याचे आर्थिक दुःख एका बाजूला आणि देश सोडण्याची मानसिक धावपळ दुसऱ्या बाजूला, अशी दुहेरी कोंडी निर्माण होईल. या प्रस्तावाचा परिणाम भारतीयांवर अधिक होण्याचे कारणही स्पष्ट आहे. अमेरिकेतील तंत्रज्ञान, वित्त, आरोग्य, उत्पादन आणि स्टार्टअप क्षेत्रात मोठ्या संख्येने भारतीय व्यावसायिक कार्यरत आहेत. भारतीय आयटी कंपन्यांपासून अमेरिकेतील मोठ्या तंत्रज्ञान कंपन्यांपर्यंत अनेक संस्थांसाठी एच-१ बी व्हिसा हे कुशल मनुष्यबळ मिळवण्याचे महत्त्वाचे माध्यम आहे. त्यामुळे नियमातील बदलाचा परिणाम केवळ कर्मचाऱ्यावर होणार नाही, तर कंपन्यांच्या मनुष्यबळ व्यवस्थापनावरही होणार आहे. याचा दीर्घकालीन परिणाम अमेरिकेवर देखील नक्कीच होणार. कारण अमेरिकेतील बहुतांश बुद्धीबळ हे भारतीयांकडूनच प्राप्त होते आणि त्यांनाच देशाच्या बाहेर काढण्याचा डाव रचला जात असेल तर अमेरिकेची अवस्था बांगलादेशासारखी झाल्याशिवाय राहणार नाही. कोणत्याही दहशतवाद्याचा अंत हा होतच असतो हे अमेरिकेच्या अर्धवटरावने ओळखायला पाहिजे. म्हणूनच अमेरिकेने हा बदल करताना आपल्या उद्योगविश्वाच्या गरजांचाही विचार करायला हवा. अत्याधुनिक तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, सेमीकंडक्टर, आरोग्य तंत्रज्ञान आणि अन्य क्षेत्रांमध्ये कुशल मनुष्यबळाची मागणी वाढत आहे. अशा परिस्थितीत आधीच अमेरिकेत कार्यरत असलेल्या कुशल कर्मचाऱ्याला अचानक देश सोडण्यास भाग पाडणे कंपन्यांसाठीही खर्चिक ठरू शकते. भारतातून नव्याने कर्मचारी आणणे किंवा अमेरिकेत उपलब्ध मनुष्यबळासाठी अधिक खर्च करणे, या दोन्ही पर्यायांचा कंपन्यांच्या खर्चावर परिणाम होईल. मात्र या संपूर्ण परिस्थितीत भारतासाठी एक मोठी संधीही दडलेली आहे. अमेरिकेतील कठोर स्थलांतर धोरणामुळे मोठ्या संख्येने भारतीय कुशल व्यावसायिक मायदेशी परतले, तर ते भारतासाठी 'रिव्हर्स ब्रेन ड्रेन' ठरू शकते. अनेक वर्षे परदेशात मिळवलेले तंत्रज्ञान, व्यवस्थापन कौशल्य, संशोधनाचा अनुभव आणि जागतिक बाजारपेठेचे ज्ञान भारताच्या विकासासाठी वापरता येऊ शकते. पण आपल्या केंद्र आणि राज्य सरकारने याचा विचार केला पाहिजे. विशेषतः कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात भारतात परतणाऱ्या या प्रतिभेला योग्य संधी देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. देशातील स्टार्टअप परिसंस्था विस्तारत आहे. डीपटेक, एआय, रोबोटिक्स, बायोटेक्नॉलॉजी आणि सेमीकंडक्टर यांसारख्या क्षेत्रांत नव्या कंपन्या उभ्या राहत आहेत. त्याचबरोबर ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर्सच्या माध्यमातून भारतात जागतिक दर्जाचे संशोधन आणि विकासकार्यही वाढत आहे. म्हणूनच अमेरिकेच्या स्थलांतर धोरणाकडे केवळ भारतीय व्यावसायिकांच्या अडचणी म्हणून पाहणे पुरेसे नाही. ही भारतासाठी आपल्या प्रतिभेला देशातच आकर्षक संधी देण्याची कसोटी आहे. परदेशात जाणाऱ्या तरुणांना रोखण्यापेक्षा, ते परतल्यास त्यांना संशोधन, उद्योग, स्टार्टअप आणि नवोन्मेषासाठी सक्षम वातावरण देणे आवश्यक आहे. असे झाल्यास आपल्या देशाचा तर विकास होईलच, परंतु अमेरिकेच्या मूर्ख नेतृत्वाला पश्चाताप नक्कीच होईल. अमेरिकेला स्थलांतर नियंत्रित करण्याचा अधिकार निश्चितच आहे; परंतु कुशल मनुष्यबळाला अस्थिरतेच्या काठावर उभे करणे हा दीर्घकालीन आर्थिक हिताचा मार्ग ठरेलच असे नाही. भारताने मात्र या बदलाकडे संकटाबरोबरच संधी म्हणून पाहिले पाहिजे. अमेरिकेच्या दारावर एच-१बीची टांगती तलवार असेल, तर भारताने आपल्या प्रतिभेसाठी विकासाच्या नव्या दारांची उघडझाप नव्हे, तर ती कायमची खुली ठेवली पाहिजेत तरच जगाचे कल्याण होईल अन्यथा आपल्याला देखील महागर्तेत पडावे लागेल.

# नवरात्रीतील नवदुर्गेचा प्रेरणादायी इतिहास



भारताच्या आणि महाराष्ट्राच्या राजकारणात आणि इतिहासात अनेक महान शौर्यशाली, धैर्यशाली धाडसी महिला होऊन गेल्या आहेत. त्यांनी समाजामध्ये मानाचे स्थान निर्माण केले आहे. अज्ञानी, दीन दुबळ्या महिलांना एकत्रित करून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे महान कार्य केलं आहे. महिला या कोमल असल्या तरी त्या कमकुवत नसतात. हे त्यांनी प्रत्यक्ष दाखवून दिलेले आहे. म्हणून त्यांनी केलेल्या कार्याचा लेखाजोखा या लेखातून आपण आज करून घेत आहोत. त्यात नवदुर्गा म्हणून..

**राष्ट्रमाता जिजाऊ-** हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांना घडवणाऱ्या आदर्श माता म्हणून ज्यांचा उल्लेख केला जातो. त्या खरोखरच नवदुर्गा आहेत. अनिष्ट चालीरीती बाजूला सारून त्यांनी शिवबाला राज्यकारभार कसा करावा. यांचे धडे दिले. संपूर्ण राजनीती शिकवली. त्यामुळेच ते एक महान राजे झाले. म्हणून राजमाता जिजाऊंचे कार्य सर्वांना प्रेरणादायी आहे.

**क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले-** यांनी भारतातील पहिल्या महिला शिक्षिका होण्याचा मान मिळवला. अंगावर शेण, माती, दगड गोटे झेलले आणि समाजासाठी झिजल्या. आजारी माणसांची सेवा केली. अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातींना जवळ केले. आपल्या घरातील पिण्याच्या पाण्याचा हौद मोकळा करून दिला. म्हणून खरोखर त्या नवदुर्गाच आहेत. असे म्हटले तरी वावगे होणार नाही. त्यांच्या साहित्यातून त्या काळातील भीषण परिस्थिती आपल्यासमोर निर्माण केली आहे. त्या वास्तविक जीवन जगल्या आणि त्या दुर्गेच्या रूपाने अवतरून दृष्टांचा नाश केला.

**डॉ.आनंदीबाई जोशी** -यांना पहिल्या भारतीय महिला डॉक्टर होण्याचा सन्मान मिळाला. त्यांचा छोटा मुलगा मरण पावला. त्यामुळे त्यांनी वैद्यकीय शिक्षण घेण्याचे ठरवले. त्यातून त्यांनी १८८६ मध्ये एम.डी ची वैद्यकीय पदवी घेतली आणि समाजासाठी अहोरात्र कार्य केले.

पुणेसारख्या ठिकाणी राहून समाजसेवा करून अनेक आजारी लोकांचे जीव वाचवले. आपलं आयुष्य हे दुसऱ्यासाठी आहे. हे त्यांना कळाले. म्हणून त्या आज त्यांच्या कार्यरूपी विचारांनी जिवंत आहेत. म्हणूनच त्यांना नवदुर्गा म्हणता येईल.

**मादाम कामा** -यांनी जर्मनीमधील स्टुटगार्ड येथे भरलेल्या जागतिक समाजवादी परिषदेत भारताचा तिरंगा ध्वज फडकवला. आणि भारताच्या स्वातंत्र्याचा प्रश्न उपस्थित केला. त्या शूर आणि धाडसी महिला होत्या. भारताचे प्रतिनिधित्व त्यांनी केले. त्यामुळे त्यांचं कार्य चिर:स्थायी आहे.

**कल्पना दत्त-** भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये क्रांतिकारी चळवळीमध्ये महिलांमधून त्यांचं कार्य अतिशय उत्तम आहे. चित्तगाव येथील शस्त्रागारावरील हल्ल्याची योजना आखलेल्या क्रांतिकारी सूर्य सेन यांच्याबरोबर त्या होत्या. क्रांतिकारकांना मदत करत. त्यांनी टेलिफोन व टेलीग्राफ यंत्रणा तोडून टाकल्या. संदेश व टेलिग्राफ यंत्रणा ठप्प केली. १६ फेब्रुवारी १९३३ रोजी सूर्य सेन यांना पकडून फाशी देण्यात आली. त्यांच्यासोबत कल्पना दत्त यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली. अशा या महान क्रांतिकारक महिला नवदुर्गेच्या रूपाने भारतीय स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होऊन भारताला स्वातंत्र्य मिळवून दिल्या आहेत.

**सरोजनी नायडू-** राष्ट्रपिता महात्मा गांधींनी सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू केली. कोणताही कायदा न मोडता सविनय पद्धतीने इंग्रजांना विरोध केला. त्या ठिकाणी सरोजिनी नायडू या त्यांच्यासोबत होत्या.

गुजरात राज्यामधील धारासना येथील सत्याग्रहाचे नेतृत्व त्यांनी केले. मिठाचा कायदा मोडण्यासाठी निघालेल्या सत्याग्रहींवर पोलिसांनी लाठी हल्ला केला. त्यावेळेस त्यांना औषधोपचार करण्यासाठी त्यांनी अखंडपणे सेवा दिली. त्यामुळे अनेक सत्याग्रहींचे प्राण वाचले आणि आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाले. अशा शूर धाडसी महिलांचे गुणगान करणे आजच्या काळाची गरज आहे. म्हणून यांना आपण नवदुर्गा म्हणतो.

**पुण्यश्लोक आहिल्याबाई होळकर-** इंदोरचे महाराजे मल्हारराव होळकरांची ही सून असून, त्यांनी २८ वर्षे राज्यकारभार केला. हजारो मंदिरांचा जीर्णोद्धार त्यांच्या हस्ते झाला. अनेक ठिकाणी त्यांनी घाट बांधले. आपला राज्यकारभार अतिशय उत्कृष्ट पद्धतीने करून गोरगरीब दीन-दुबळ्यांना मदत केली. पती मरण पावल्यानंतर सुद्धा त्यांनी राज्यकारभार सांभाळला. त्यांचे कार्य सुवासिक सुगंधासारखे दरवळत आहे. अनेक लढाया लढवून प्रतिस्पर्ध्यांना त्यांनी पळून लावले. त्यांची राजनीती वाखाणण्याजोगी होती. त्यांनी शत्रू पक्षाला सळो की पळो करून सोडले. म्हणून नवदुर्गाच्या रूपाने त्या आजही आपल्यात आहेत.

**दगडाबाई शेळके** - हैदराबाद मुक्तिसंग्रामामध्ये पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून पुरुषी वेष धारण करून शत्रू सैन्यावर तुटून पडून त्यांना सळो की पळो करून सोडणाऱ्या अतिशय महापराक्रमी अशा या महिला होत्या. त्यांचं कार्य मराठवाडा मुक्ती संग्रामात अतिशय महत्त्वाचे होते.

एक महिला काय करू शकते? हे त्यांच्याकडून आपण शिकू शकतो. त्यांनी आपल्या जीवनात माघार कधीही घेतली नाही.

आपला देश आणि आपण यांची सांगड घालून मराठवाडा मुक्त करण्यासाठी प्रयत्नाची पराकाष्ठा केली. म्हणून त्यांना आपणाला आधुनिक नवदुर्गा म्हणता येते.

**मदर तेरेसा-** रोमच्या धर्मगुरूंनी त्यांच्या सामाजिक कार्याला मान्यता दिली.

कुष्ठरोगीयांच्या कार्यासाठी त्यांनी फिरते दवाखाने काढले. कॅथोलिक रिलीफ या संस्थेने मदर तेरेसाच्या शाळेतील मुलांना जेवण व दूध दिले. समाजातील लोकांची मने त्यांच्याकडे वळू लागली. अभ्यासिका, निवासस्थाने, प्रार्थना मंदिरे यांची सुविधा उपलब्ध करून दिली.कुमातानी टाकून दिलेल्या छोट्या अर्भकांना त्यांनी सांभाळले. बाळ शिशुभवनात आणले.त्यांना स्वच्छ करून उपचार केले. म्हणून त्यांना मदर असे म्हणतात.

भारत सरकारने त्या परकीय असून-सुद्धा भारतातील लोकांची सेवा केली. म्हणून भारतातील सर्वात मोठा नागरी पुरस्कार 'भारतरत्न' त्यांना प्रदान केला. त्यांच्या नावाने टपाल तिकीट प्रसिद्ध केले. जगातील सर्वोच्च मानाचे नोबेल शांतता पारितोषिक हे त्यांना जाहीर झाले. त्यामुळे अशा नवदुर्गांचे स्मरण होणे गरजेचे आहे.

आज नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने दररोज वेगवेगळ्या रंगाची साडी वापरून समाजामध्ये माता भगिनी फिरत आहेत. त्यामुळे अंधश्रद्धा जास्तीत जास्त वाढत आहेत.

अनेक ठिकाणी वाईट प्रसंग घडत आहेत. दांडियाच्या नावाखाली तरुण मुलीं वाम मार्गाला लागत आहेत. उपवासाच्या नावाखाली अपचन होणारे पदार्थ खाल्ले जात आहेत. भारतीय संस्कृतीमध्ये असणारे नैतिक मूल्य घसरत आहेत अशी भीती निर्माण झाली आहे. आणि दुर्गा मंडळाची संख्या दरवर्षी वाढत आहे. वर्गणीमधून नवीन वाद निर्माण होत आहेत. आरतीचा मान कोणाला दिला जाईल यावर संशोधन केलं जात आहे. प्रत्येक गावात अगोदर दुर्गामातेचे एक मंदिर असे. आता गलोगल्ली वेगवेगळे मंडळे महाकाली, रणचंडिका, भवानी, शारदा, दुर्गा, रेणुका, जगदंबा, सप्तशृंगी अशा विविध नावाने बसविले जात आहेत. आजच्या तरुणींने नवदुर्गाच्या निमित्ताने आपणही सामाजिक शैक्षणिक कार्य करावे. ऑलिंपिकच्या खेळामध्ये सहभागी कसे होता येईल ते पहावे. वाचन संस्कृती वाढवावी. आपल्या देशाची सभ्य संस्कृती जोपासावी.

देवीच्या वेगवेगळ्या रूपात आपण महत्त्वाचे कार्य करावेत. तेव्हाच नवरात्र उत्सव आनंदाने साजरा होईल. यांचे जीवाला समाधान मिळेल. यात कोणतीही शंका नाही. नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने सर्व महिलांना खूप खूप शुभेच्छा.


**-प्रा. विठ्ठल बरसमवाड**
अध्यक्ष:
विठू माऊली प्रतिष्ठान गोकुळवाडी, ता.मुखेड


# माझी नवदुर्गा माझ्या आयुष्यातील आदिशक्ती, माझी आई!

तिच्या कुशीत माझं बालपण फुललं, तिच्या संस्कारांत माझं व्यक्तिमत्त्व घडलं आणि तिच्या संघर्षातून मला जगण्याचं बळ मिळालं.

आई, नवरात्र म्हटलं की डोळ्यांसमोर आदिशक्तीची नऊ रूपं उभी राहतात. कुणी तिला दुर्गा म्हणतं, कुणी भवानी, कुणी जगदंबा, तर कुणी आदिशक्ती! पण माझ्यासाठी या आदिशक्तीचं एक जिवंत रूप आहे, जिला मी रोज अनुभवते, जिच्या विचारांतून मला प्रेरणा मिळते, जिच्या संघर्षातून मला लढण्याचं बळ मिळतं आणि जिच्या आशीर्वादाने माझ्या आयुष्याला दिशा मिळते ती म्हणजे माझी आई! देवळातल्या देवीसमोर नतमस्तक होताना मला नेहमीच जाणवतं की, शक्तीचं खरं स्वरूप केवळ मूर्तीत नसतं; ते आपल्या आयुष्यातील अशा स्त्रीमध्येही असतं, जी स्वतःच्या संघर्षांशी दोन हात करत इतरांच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करते. माझ्यासाठी ती स्त्री म्हणजे माझी आई माझ्या आयुष्यातील दुर्गा!

आई, तुझ्याविषयी लिहायला बसले की शब्द अपुरे पडतात. कारण तू माझ्यासाठी केवळ जन्मदात्री नाहीस, तर माझी प्रेरणा, माझा आदर्श, माझा आत्मविश्वास आणि माझ्या प्रत्येक संघर्षातील अदृश्य शक्ती आहेस. माझ्या व्यक्तिमत्त्वाचा पाया तू घातलास, माझ्या विचारांना दिशा दिलीस आणि समाजात स्वतःची ओळख निर्माण करण्याचं धैर्यही तूच दिलंस. तुझा बालपणापासून आजपर्यंतचा प्रवास पाहताना मला नेहमीच एका गोष्टीचं आश्चर्य वाटतं.एका स्त्रीने इतक्या जबाबदाऱ्या पार पाडत स्वतःचं सामाजिक भान कसं जपलं असेल? मुलगी, बहीण, पत्नी, आई, सून अशा असंख्य नात्यांची कर्तव्यं निभावताना तू समाजाप्रती असलेली आपली बांधिलकी कधीही विसरली नाहीस.

घराच्या उंबरठ्यापलीकडे जाऊन समाजातील प्रश्न समजून घेतलेस. महिलांच्या प्रश्नांवर आवाज उठवलास. अन्यायाविरुद्ध लढण्याचं धैर्य दाखवलंस. स्वतःच्या कार्यातून अनेक महिलांना प्रेरणा दिलीस. कुणाची ताई, कुणाची आधारवड, तर असंख्य मुलींसाठी मायेची सावली असलेली 'माई' बनलीस.

तू केवळ नाती जपली नाहीस, तर माणसं जोडलीस. केवळ संसार सांभाळला नाहीस, तर समाजाचं भानही जपलंस. स्वतःच्या अनुभवांतून इतरांना जगण्याची दिशा दिलीस.

आई, तुझ्याकडे पाहताना मला आदिशक्तीच्या रूपातील दुर्गेची आठवण होते. कारण दुर्गा म्हणजे केवळ हातात शस्त्र धारण केलेली देवी नव्हे; तर संकटांसमोर न झुकणारी, अन्यायाविरुद्ध उभी राहणारी आणि इतरांना जगण्याचं बळ देणारी शक्तीही आहे. तुझ्यात मला याच शक्तीचं दर्शन घडतं. तुझ्या आयुष्याचा प्रवास शब्दबद्ध व्हावा, तुझ्या संघर्षांची कहाणी पुढच्या पिढीपर्यंत पोहोचावी, यासाठी मी अनेकदा तुझ्याकडे हट्ट केला. तुझं आत्मचरित्र लिहिण्याची इच्छा व्यक्त केली. पण तू कधी स्वतःच्या कर्तृत्वाचा गाजावाजा केला नाहीस. तुझ्या संघर्षांचं प्रदर्शन केलं नाहीस. तुझ्या अनुभवांतून मात्र मला जगण्याचं तत्त्वज्ञान शिकवत राहिलीस. कदाचित म्हणूनच तुझं आयुष्य माझ्यासाठी एखाद्या पुस्तकापेक्षाही मोठं आहे. त्या पुस्तकाच्या प्रत्येक पानावर संघर्ष आहे, प्रत्येक ओळीत संस्कार आहेत आणि प्रत्येक शब्दामागे एका आईचं निःस्वार्थ प्रेम आहे.

आई, माझ्या आयुष्यात असे अनेक प्रसंग आले, जेव्हा विरोधकांच्या टीकेमुळे मी डगमगले. मन अस्वस्थ झालं, आत्मविश्वास कमी झाला; पण प्रत्येक वेळी तू मला सावरलंस. तुझ्या शब्दांनी माझ्या मनात पुन्हा लढण्याचं बळ निर्माण केलंस.

तू मला सांगितलेलं एक वाक्य आजही माझ्या मनात कोरलं गेलं आहे. ज्यावेळी आपले विरोधक तयार होतात, त्यावेळी माणसाने आपली प्रगती झाली आहे, असे समजायचे! डगमगून आपले कार्य थांबवायचे नाही.

आई, तुझं हे वाक्य माझ्यासाठी केवळ सल्ला नाही, तर माझ्या संघर्षाचा मंत्र आहे. तू माझ्यासाठी प्रत्येक लढाई लढली नाहीस; पण प्रत्येक लढाई लढण्याचं धैर्य दिलंस. माझ्यासाठी प्रत्येक वाट सोपी केली नाहीस; पण कठीण वाटेवरून चालण्याचा आत्मविश्वास दिलास. मुलीला केवळ सुखाच्या सावलीत वाढवणं म्हणजे आईपण नव्हे, तर तिला संघर्षांच्या उन्हातही ताठ मानेने उभं राहण्याचं सामर्थ्य देणं म्हणजे आईपण! आणि माझ्या आईने मला नेमकं हेच दिलं. आज मी समाजात वावरते, महिलांच्या प्रश्नांवर बोलते, सामाजिक कार्यात सहभागी होते आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवते, तेव्हा माझ्या प्रत्येक कृतीच्या मुळाशी तुझे संस्कार असतात. तुझ्या विचारांचं बोट धरून मी समाजाकडे पाहायला शिकले. तुझ्या कार्यातून सामाजिक बांधिलकी समजून घेतली आणि तुझ्या संघर्षातून स्वतःच्या विचारांवर ठाम राहण्याचं बळ मिळवलं. तरीही आजच्या समाजाकडे पाहताना मन अस्वस्थ होतं. महिला सुशिक्षित झाल्या, आधुनिक झाल्या, प्रत्येक क्षेत्रात पुढे गेल्या; पण त्या खऱ्या अर्थाने स्वतंत्र आणि सुरक्षित झाल्या का? त्यांच्या विचारांना, निर्णयांना आणि अस्तित्वाला समाजाने पूर्णपणे स्वीकारलं का? हे प्रश्न आजही अनुत्तरित आहेत. अशा वेळी तुझ्या कार्याची, तुझ्या विचारांची आणि तुझ्या अनुभवांची समाजाला किती गरज आहे, याची जाणीव होते. तू दाखवलेली वाट अधिक व्यापक करणं, महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणं आणि नव्या पिढीतील मुलींना स्वाभिमानाने जगण्याचं बळ देणं, हीच तुझ्या कार्याला वाहिलेली खरी आदरांजली असेल.

तू पेटवलेली परिवर्तनाची ज्योत मला पुढे घेऊन जायची आहे. तुझ्या विचारांचा वारसा केवळ जपायचा नाही, तर तो पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवायचा आहे. कारण तुझ्या कुशीत घडलेली मुलगी म्हणून तुझ्या विचारांना कृतीत उतरवणं, हीच माझ्यासाठी तुझ्या संस्कारांची खरी पूजा आहे.

नवरात्रात आपण देवीच्या नऊ रूपांची पूजा करतो. प्रत्येक रूपातून आपल्याला शक्ती, धैर्य, ज्ञान, करुणा आणि संकटांवर मात करण्याची प्रेरणा मिळते. पण माझ्यासाठी या सर्व गुणांचं एकत्रित रूप माझ्या आईमध्ये आहे. तुझ्यात मला दुर्गेचं धैर्य दिसतं, जगदंबेची माया जाणवते, सरस्वतीचं ज्ञान अनुभवायला मिळतं आणि अन्नपूर्णेचा वात्सल्यभाव दिसतो. म्हणूनच माझ्यासाठी नवरात्र म्हणजे केवळ देवीच्या आराधनेचे नऊ दिवस नाहीत; तर माझ्या आयुष्यातील या जिवंत शक्तीप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा उत्सव आहे. देवीच्या मूर्तीसमोर नतमस्तक होताना माझ्या मनात तुझाच चेहरा उभा राहतो. कारण ज्या शक्तीची मी मंदिरात पूजा करते, त्याच शक्तीचं दर्शन मला माझ्या आईच्या रूपात घडतं.

आई, तुझ्या कष्टांची आणि त्यागाची मला जाणीव आहे. माझ्यासाठी तू कितीदा स्वतःच्या इच्छा बाजूला ठेवल्यास, कितीदा स्वतःच्या वेदना मनात दडवल्यास आणि माझ्या आनंदात स्वतःचा आनंद शोधलास, हे मला माहीत आहे. कदाचित प्रत्येक वेळी मी ते बोलून दाखवत नसेन; पण तुझ्याविषयीचं माझं प्रेम, आदर आणि कृतज्ञता शब्दांपलीकडची आहे. तुझ्या ऋणातून मी कधीच मुक्त होऊ शकणार नाही; पण तुझ्या संस्कारांचा वारसा जपत आयुष्य जगण्याचा प्रयत्न नक्की करेन.

आई, माझ्या आयुष्यात कितीही संकटं आली, कितीही विरोध झाला, तरी तुझ्या शिकवणीची शिदोरी माझ्यासोबत असेल, तर पुन्हा उभं राहण्याचं बळ माझ्यात असेल. तुझ्या डोळ्यांत माझ्याविषयीचा अभिमान दिसावा, माझ्या कार्यातून तुझ्या संस्कारांचं प्रतिबिंब उमटावं आणि माझ्या वाटचालीतून तुझ्या विचारांचा वारसा पुढे जावा, एवढीच माझी इच्छा आहे.

आज या नवरात्र महोत्सवाच्या निमित्ताने आई तुळजाभवानीच्या चरणी एकच प्रार्थना करतेमाझ्या आईला उत्तम आरोग्य लाभो, तिच्या चेहऱ्यावरचं हास्य सदैव खुलत राहो, तिच्या आयुष्यात सुख-समाधान नांदो आणि तिच्या विचारांचा प्रकाश असंख्य महिलांच्या आयुष्याला दिशा देत राहो.

आई, तू माझ्या आयुष्यात आहेस, हे माझं भाग्य आहे. तुझ्या संस्कारांत घडले, हे माझं सौभाग्य आहे. आणि तुझ्या विचारांचा वारसा पुढे नेण्याची संधी मिळते आहे, ही माझ्यासाठी सर्वांत मोठी जबाबदारी आहे. माझा पुनर्जन्मावर विश्वास नाही; पण पुन्हा जन्म घेण्याची संधी मिळालीच, तर पुढच्या सातही जन्मांत तुझ्याच कुशीत जन्माला यावं, तुझीच मुलगी म्हणून तुझं प्रेम अनुभवावं आणि पुन्हा एकदा तुझ्याच संस्कारांत घडावं, एवढीच प्रार्थना आई तुळजाभवानीच्या चरणी करेन. कारण आई, या जगात मला अनेक नाती मिळाली, अनेक माणसं भेटली आणि अनेक वाटा सापडल्या; पण तुझ्यासारखी आई आणि तुझ्या कुशीत मिळालेली मायेची सावली पुन्हा कुठेच मिळणार नाही. तुझं आयुष्य हेच माझ्यासाठी प्रेरणेचं पुस्तक आहे. तुझे संस्कार हीच माझ्या आयुष्याची शिदोरी आहे आणि तुझं प्रेम हीच माझ्या जगण्याची सर्वांत मोठी श्रीमंती आहे. आज देवीच्या चरणी नतमस्तक होताना मनापासून एवढंच म्हणावंसं वाटतं

आई, तूच माझी दुर्गा, तूच माझी आदिशक्ती!

तुझ्या संघर्षात मला धैर्य दिसतं, तुझ्या मायेतील जगदंबा अनुभवते आणि तुझ्या संस्कारांत माझ्या आयुष्याचा प्रकाश शोधते. देवीच्या रूपात जिची पूजा करते, तीच शक्ती माझ्या आयुष्यात आई म्हणून आली, हेच माझं सर्वांत मोठं भाग्य! माझ्या आयुष्यातील नवदुर्गेला, माझ्या आईला मनःपूर्वक वंदन!


तुझीच मुलगी
**-सौ. सुचिता जोगदंड वडजे**


# दुर्गा महोत्सवानिमित्त...

## (कर्तृत्ववान महिला विशेष)

### न्यायदानाच्या रणांगणातील

### रणरागिणी : ॲड. मणिकुमारी बत्तुला (डांगे)



नवरात्री म्हणजे नऊ दिवस स्त्री शक्तीची उपासना. आपण देवीच्या नऊ रूपांची पूजा करतो. पण आपल्या आजूबाजूला अशा अनेक जिवंत दुर्गा आहेत, ज्या रोज अन्यायाविरुद्ध लढत आहेत. त्यापैकीच एक नाव म्हणजे नांदेडच्या अतिरिक्त सरकारी अभियोक्ता ड. मणिकुमारी बत्तुला (डांगे).

माहेर आंध्राचं, सासर कंधारचं असलेलं हे व्यक्तिमत्व म्हणजे दोन संस्कृतींचा सुंदर संगम आहे. *त्यांचे वडील आप्पाराव बत्तुला आणि आई शकुंतला बत्तुला. त्यांचं मूळ गाव विजयनगरम्, आंध्रप्रदेश. माहेरच्या संस्कारातून मिळालेली जिद्द आणि सासरच्या कंधार नगरीतून मिळालेली आपुलकी, यातून त्यांचं कर्तृत्व घडलं. शिक्षण घेत असतानाच त्यांना वकिली व्यवसायाची आवड निर्माण झाली आणि म्हणूनच त्यांनी हे क्षेत्र निवडलं. आयुष्यात काहीतरी करायचं आहे, स्वतःला सिद्ध करायचं आहे या ध्येयाने त्यांनी नांदेड येथील नामांकित एन.सी. विधी महाविद्यालयातून बी.एस.एल. व एल.एल.बी. पदवी संपादन केली. कायद्याचे सखोल ज्ञान प्राप्त करण्यासाठी त्यांनी भारती विद्यापीठ, पुणे येथून एल.एल.एम. ही पदव्युत्तर पदवी देखील प्राप्त केली. हा केवळ शैक्षणिक प्रवास नव्हता, तर न्यायदानाच्या वाटेवरचा भक्कम पाया होता.

ऑगस्ट २०१५ रोजी त्यांची विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्ती झाली. तर ऑक्टोबर २०१५ रोजी त्यांची अतिरिक्त सरकारी अभियोक्ता तथा सहाय्यक सरकारी वकील, नांदेड येथे नियुक्ती करण्यात आली. सन २०२० मध्ये महाराष्ट्र शासनाकडून नांदेड येथे पोक्सो (झजउडज) खटल्यांकरिता विशेष अतिरिक्त सरकारी अभियोक्ता म्हणून त्यांची नियुक्ती व अधिसूचना निर्गमित करण्यात आली. त्यांची २०२० ची ही नियुक्ती अत्यंत महत्त्वाची आहे. कारण महाराष्ट्रातील सर्वात कमी वयाची विशेष सरकारी वकील म्हणून शासनाने त्यांची निवड केली. पोक्सो सारख्या संवेदनशील खटल्यांकरिता शासनाने खास त्यांच्यावर विश्वास दर्शविला. अल्पवयीन पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी शासनाने त्यांची विशेष निवड केली, हीच त्यांच्या कार्याची खरी पावती आहे.

आजपर्यंत त्यांनी दिवाणी आणि फौजदारी अशा २००० पेक्षा अधिक प्रकरणांचे कामकाज पाहिले आहे. या आकड्यामागे २००० कुटुंबांचे अश्रू, वेदना आणि न्यायाची आस आहे. गुन्हेगार सुटता कामा नये या दृष्टिकोनातून त्या आपले काम अत्यंत निष्ठेने करतात. विशेषतः बलात्कार, खून आणि पोक्सो (झजउडज) सारख्या संवेदनशील आणि गुंतागुंतीच्या प्रकरणांमध्ये त्यांनी अत्यंत कुशलतेने काम केले आहे. पोक्सो प्रकरणात पीडित अल्पवयीन बालकांना न्याय मिळवून देणे हे केवळ कायदेशीर काम नसून ते एक सामाजिक उत्तरदायित्व आहे, जे त्या अत्यंत संवेदनशीलतेने पार पाडतात. त्यांच्या प्रभावी युक्तिवादामुळे अनेक गुन्हेगारांना जन्मठेपेची शिक्षा झाली आहे. हीच त्यांच्या यशाची आणि न्यायदानातील धारेची खरी ओळख आहे. त्या जेव्हा न्यायालयात युक्तिवादासाठी उभ्या राहतात, तेव्हा त्यांच्या शब्दांत कायद्याची धार असते आणि मनात पीडितांबद्दलची करुणा असते. त्या केवळ सरकारी अभियोक्ता म्हणून काम करत नाहीत, तर त्या पीडितांचा आवाज बनून न्यायालयासमोर उभ्या राहतात. हे त्यांच्या कार्याचे वैशिष्ट्य आहे. तब्बल अकरा वर्षांपासून त्या या क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांच्या यशामागे त्यांच्या कुटुंबाची मोठी साथ आहे. *त्यांचे सासरे गोविंदराव डांगे स्वतः वकील असल्याने कायद्याची परंपरा त्यांच्या घरातच आहे. आणि त्यांचे पती अनिल गोविंदराव डांगे यांचा तर त्यांना कायम पूर्ण पाठिंबा आहे. घरच्या भक्कम आधारामुळेच त्या न्यायाच्या रणांगणात निडरपणे लढू शकतात.

आजच्या काळात जेव्हा मुलींना आपले करिअर घडवायचे आहे, तेव्हा ड. मणिकुमारी बत्तुला (डांगे) यांचा प्रवास हा एक दीपस्तंभ आहे. त्यांनी दाखवून दिले की, स्त्रीने ठरविले तर ती कोणत्याही क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध करू शकते. कायद्याच्या चौकटीत राहून समाजाला न्याय देऊ शकते, अन्यायाविरुद्ध रणरागिणी होऊ शकते. अशा या धाडसी, कर्तृत्ववान नवदुर्गेला लेखमालेद्वारे मानाचा मुजरा!


**संकलन - विद्या आळणे**
**शब्दांकन - रुपाली वागरे/वैद्य**

# ‘महिला किसान दिन २०२६’ कार्यशाळा; नांदेड जिल्ह्यातील १६ तालुक्यांतील २९० महिला शेतकरी व कृषी सखींचा सहभाग

## महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणातून शेतीला नवी दिशा !



**नांदेड (प्रतिनिधी)–** शेतीतील महिलांचे योगदान अधोरेखित करत आधुनिक कृषी तंत्रज्ञान, शेतीपुरक उद्योग, मूल्यवर्धन आणि शासकीय योजनांच्या माध्यमातून महिला शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्याच्या उद्देशाने ‘महिला किसान दिन २०२६’ निमित्त जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभाग, कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा), नांदेड आणि कृषी विज्ञान केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे झालेल्या या कार्यशाळेत जिल्ह्यातील १६ तालुक्यांमधील २९० महिला शेतकरी व कृषी सखी सहभागी झाल्या.

शारदीय नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून नऊ महिला शेतकऱ्यांच्या हस्ते प्रतिमापूजन व दीपप्रज्वलन करून कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी तथा आत्माचे प्रकल्प संचालक दत्तकुमार कळसाईत यांनी प्रास्ताविकात शेती क्षेत्रातील महिलांचे महत्त्वपूर्ण योगदान अधोरेखित केले. महिलांनी पारंपरिक शेतीच्या पलीकडे जाऊन आधुनिक तंत्रज्ञान, शेतीपुरक व्यवसाय आणि कृषिमालाच्या मूल्यवर्धनाचा अवलंब करावा, असे आवाहन त्यांनी केले.

नांदेड, मुखेड आणि उमरी तालुक्यांतील महिला शेतकऱ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात ‘महिला शेतकरी प्रमाणपत्रां’चे वितरण करण्यात आले. प्रमाणपत्र नोंदणी मोहिमेत विशेष पुढाकार घेऊन सर्वाधिक नोंदणी घडवून आणल्याबद्दल कंधार तालुक्यातील गऊळ येथील सौ. शिवकांता ज्ञानेश्वर हेंडगे आणि लोहा तालुक्यातील दापशेड येथील सौ. वैष्णवी विश्वनाथ होळगे यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

या कार्यशाळेत कृषी विज्ञान केंद्र, सगरोळी येथील शास्त्रज्ञ डॉ. माधुरी रेवनवार यांनी गृहउद्योग, प्रक्रिया उद्योग आणि शेतीपुरक व्यवसायांच्या संधींबाबत मार्गदर्शन केले. कृषी विज्ञान केंद्र, पोखर्णी येथील विषय विशेषज्ञ सौ. अलका पवळे-पाटील यांनी महिलांचे आरोग्य, पोषण आणि संतुलित आहाराचे महत्त्व विशद केले. कृषी विज्ञान केंद्र, सगरोळी येथील शास्त्रज्ञ सौ. प्रियंका खोले यांनी सूक्ष्म सिंचन, पावसाच्या पाण्याचे संकलन आणि उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करण्याच्या तंत्रज्ञानाची माहिती दिली.

जिल्हा उद्योग केंद्राचे सहायक उद्योग अधिकारी अरविंद हांडे यांनी महिलांसाठीच्या शासकीय उद्योग योजना, अनुदान आणि स्वयंरोजगाराच्या संधींबाबत माहिती दिली. कापूस संशोधन केंद्राचे तज्ज्ञ डॉ. अरविंद पांडागळे यांनी अवर्षणप्रवण परिस्थितीत उपयुक्त ठरणाऱ्या करडई पिकाचे सुधारित वाण, लागवड तंत्रज्ञान आणि खत व्यवस्थापन याविषयी मार्गदर्शन केले. प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या संचालिका सौ. स्वाती बहीणजी यांनी ‘योगिक शेती’ संकल्पनेतून आत्मिक बळ, मानसिक शांतता आणि सकारात्मक विचारांचे महत्त्व स्पष्ट करत महिला सक्षमीकरणाचा संदेश दिला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किनवटचे तालुका तंत्र व्यवस्थापक शिवप्रकाश पटवे यांनी केले, तर आत्माच्या प्रकल्प उपसंचालक अर्चना गुंजकर यांनी आभार मानले. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी जिल्ह्यातील तालुका तंत्र व्यवस्थापक, सहाय्यक तालुका तंत्र व्यवस्थापक तसेच आत्मा, पोकरा आणि स्मार्ट प्रकल्पातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# कर्नाटकात अडीच हजार तर महाराष्ट्रात पाच हजारांची मदत

## फडणवीस सरकारच्या निर्णयाचे स्वागत करीत आ. अमरनाथ राजूरकर यांची काँग्रेस सरकारवर टीका

**नांदेड (प्रतिनिधी)–** कर्नाटकातील काँग्रेस सरकारने अडीच हजार तर महाराष्ट्रातील भाजप सरकारने दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना ५ हजारांची मदत जाहीर केली आहे. राज्यातील ३०५ तालुके दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर करण्यात आले असून, शेतकऱ्यांच्या खात्यात दिवाळीपूर्वी पाच हजार रुपयांचे अग्रिम अर्थसहाय्य जमा करण्याच्या निर्णयाचे भाजपचे नांदेड शहर महानगराध्यक्ष अमरनाथ राजूरकर यांनी स्वागत केले आहे.

दुष्काळाच्या गंभीर परिस्थितीत शेतकऱ्यांकडे कर्जवसुलीकरिता तगादा लावणाऱ्या यंत्रणांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सक्त तंबी दिली असून पिण्याचे पाणी आणि पुरेशा चारा उपलब्धतेसाठी ठोस उपाययोजनांद्वारे दुष्काळाशी दोन हात करण्याची तयारी केली आहे. दुष्काळी तालुक्यांतील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्यात आले असून जनावरांना पुरेसा चारा उपलब्ध व्हावा याकरिता चारा देणाऱ्या पिकांचे नियोजन करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांकडून हमीभावाने चारा खरेदी करण्याचा निर्णय घेऊन जनावरांना जगविण्याची हमी सरकारने घेतल्याने शेतकऱ्यांनीही दुष्काळाचा सामना करण्यासाठी हातात हात घालून सरकारला साथ द्यावी, असे आवाहनही त्यांनी केले.

राज्यातील दुष्काळी स्थिती ही नैसर्गिक आपत्ती आहे. अशा परिस्थितीचा सामना करण्यासाठी सर्वांनी सामूहिकपणे प्रयत्न करण्याची गरज असताना या प्रश्नावर विरोधकांकडून केले जाणारे राजकारण दुर्दैवी आहे, अशी खंतदेखील आ. राजूरकर यांनी व्यक्त केली. राज्यात साडेसात अश्वशक्तीपर्यंतच्या कृषी पंपांचा वीजपुरवठा मोफत आहे. कर्जवसुलीच्या तगाद्यातून शेतकऱ्यास दिलासा मिळाला आहे. शेतकऱ्यांना पाच हजार रुपयांची अग्रिम मदत मिळणार आहे, दुष्काळग्रस्त तालुक्यांतील विद्यार्थ्यांना सरसकट परीक्षा शुल्क माफ करण्यात येत आहे. याशिवाय राज्यातील दोन लाखांहून अधिक अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या कुटुंबांना दोन हजार रुपयांची भाऊबीज देऊन सरकारने कुटुंबप्रमुखाची जबाबदारी संवेदनशीलतेने पेलली आहे.

केंद्र आणि राज्य सरकारच्या वतीने राज्यातील पात्र शेतकरी कुटुंबांना बारा हजार रुपयांच्या वार्षिक सन्मान निधीमुळे समस्याग्रस्त शेतकऱ्यांना सरकारकडून मोठा दिलासा मिळालेला आहे. यासाठी राज्याच्या तिजोरीतून सहा हजार कोटींहून अधिक निधी उपलब्ध करून देण्यात आला असल्याने बळीराजासाठी संवेदनशीलतेने मदतीचा हात पुढे करणाऱ्या महाराष्ट्रातील फडणवीस सरकारचे अनुकरण काँग्रेसशासित राज्यांनी केले पाहिजे, असा सल्लाही आ. राजूरकर यांनी दिला.

### कर्नाटकातील काँग्रेस सरकारकडून शेतकऱ्यांना फक्त अडीच हजारांची मदत

फडणवीस सरकारने पाच हजार रुपयांची अग्रिम मदत जाहीर केलेली असताना, कर्नाटकातील काँग्रेस सरकारने मात्र दुष्काळात होरपळणाऱ्या शेतकऱ्यांची केवळ अडीच हजार रुपये मदतीच्या घोषणेवर बोळवण केली आहे, याकडे आ. राजूरकर यांनी लक्ष वेधले. फडणवीस सरकारने जाहीर केलेली मदत कर्नाटकापेक्षा दुप्पट असून महाराष्ट्र सरकारने मदत जाहीर केली असताना कर्नाटक सरकार मात्र अजूनही केंद्राकडून मदत मिळण्याची वाट पाहात असल्याने तेथील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या हातात प्रत्यक्षात ही पुटपुंजी मदत तरी वेळेवर मिळेल का याबाबत शंकाच आहे, असे ते म्हणाले. पीएम किसान सन्मान योजना, नमो शेतकरी योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, प्रधानमंत्री पीकविमा योजनेतील राज्याचा सहभाग, कृषी पंपांना वीजबील माफी, आणि दिवाळीपूर्वी पाच हजार रुपयांची अग्रिम मदत अशा अनेक योजनांद्वारे शेतकऱ्याच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या असलेल्या फडणवीस सरकारने दुष्काळाला तोंड देण्याची सज्जता केली आहे. आता सर्वांनी मिळून त्याला साथ द्यावी, विरोधकांनी राजकारण न करता जनतेच्या हिताचा विचार करावा आणि पुढच्या पिढ्यांना दुष्काळाच्या समस्येतून कायमची मुक्ती देण्याच्या मुख्यमंत्री फडणवीस यांच्या संकल्पास शक्ती द्यावी, असे आवाहनही आ. अमरनाथ राजूरकर यांनी केले आहे.

### नांदेड- जालनाहून नागपूरसाठी विशेष रेल्वेगाड्या

**नांदेड (प्रतिनिधी)–** नागपूर येथे २० ऑक्टोबर रोजी होणाऱ्या धम्मचक्र प्रवर्तन दिन सोहळ्यासाठी जाणाऱ्या भाविकांची गर्दी लक्षात घेऊन दक्षिण मध्य रेल्वेने नांदेड आणि जालनाहून विशेष गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे.

०७०८५ नांदेड-नागपूर: दि. १९ ऑक्टोबर (सोमवार) रोजी रात्री ८ वाजता नांदेडहून प्रस्थान - मुदखेड, भोकर, हिमायतनगर, किनवट, आदिलाबाद, पिंपळकुट्टी मार्गे दि. २० रोजी सकाळी १०.२५ वा. नागपूरला पोहोचेल. ०७०८६ नागपूर-नांदेड: दि. २० ऑक्टोबर (मंगळवार) रोजी रात्री ११.५५ वा. नागपूरहून प्रस्थान - २१ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ वाजता नांदेडला पोहोचेल. ०७०८३ जालना-नागपूर: दि. १९ ऑक्टोबर रोजी सायं. ५ वाजता जालनाहून प्रस्थान - परतूर, सेलू, मानवत रोड, परभणी, पूर्णा, बसमत, हिंगोली, वाशिम, अकोला मार्गे दि. २० रोजी दुपारी १२.१० वाजता नागपूरला पोहोचेल.

# ‘इथे राष्ट्र घडते’ हा ग्रंथ घरोघरी पोहोचवावा -शिवाजीराजे पाटील

## शिक्षण व्यवस्थेत समग्र परिवर्तनासाठी कुटुंबातून सामुदायिक पारायणाची गरज

**नांदेड (प्रतिनिधी)–** केवळ शिक्षकांचा सन्मान वाढविण्यासाठीच नव्हे, तर एकूणच शिक्षण व्यवस्थेत समग्र परिवर्तन घडवून आणण्यासाठी प्रफुल्ल तावरे लिखित ‘इथे राष्ट्र घडते’ हा ग्रंथ घरोघरी पोहोचला पाहिजे. या ग्रंथाचे प्रत्येक कुटुंबात सामुदायिक पारायण व्हावे, असे प्रतिपादन केसीसी सीईटी सेंटरचे सीईओ तथा वीर भगतसिंग विद्यार्थी परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष इंजि. शिवाजीराजे पाटील बाभळीकर यांनी केले.

शिवास्त्र फाऊंडेशन, भिमालय प्रतिष्ठान आणि कोनाळे कोचिंग क्लासेस यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्रफुल्ल तावरे लिखित ‘इथे राष्ट्र घडते’ या ग्रंथाच्या प्रमोशन प्रोग्राममध्ये पत्रकार शिवाजीराजे पाटील बोलत होते. शिक्षण क्षेत्रात सकारात्मक बदल घडविण्याच्या उद्देशाने हे अभियान राबविण्यात येत आहे.

केसीसीचे संस्थापक प्रा. व्ही. डी. कोनाळे, प्रा. दत्तात्रय बिरादार, प्रा. योगेश कन्हेरे आणि व्यवस्थापकीय संचालक अनुसया कोनाळे यांच्या संकल्पनेतून हा प्रमोशन प्रोग्राम सर्वत्र राबविण्यात येत आहे.

या अभियानात अप्पर पोलीस अधीक्षक सूरज गुरव, प्रा. डॉ. व्यंकटी पावडे, आंबेडकरवादी मिशनचे प्रमुख दीपक कदम, स्वप्नील बेंद्रीकर, केंब्रिज विद्यालयाच्या संचालक-प्राचार्य रेवती गव्हाणे, राजश्री पब्लिक स्कूलचे संस्थापक दिलीप पाटील, ऑक्सफर्ड इंटरनॅशनल स्कूलच्या प्राचार्या अनुराधा वरदाचारलू, नरहर कुरुंदकर हायस्कूलचे डॉ. बाबू कमले आणि शासकीय तंत्रनिकेतनचे विभागप्रमुख डॉ. गणपत डख यांच्यासह अनेक मान्यवरांना इथे राष्ट्र घडते हा ग्रंथ अवलोकनार्थ भेट देण्यात आला.

# स्वारातीम विद्यापीठाच्या रसायनशास्त्र संकुलात ‘इंडस्ट्रियल अकॅडेमीया समिट’ उत्साहात साजरी




**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील रसायनशास्त्र संकुलात गुरुवार, दि.१५ ऑक्टोबर रोजी उद्योग आणि शैक्षणिक क्षेत्रातील परस्पर सहकार्य वाढवण्याच्या उद्देशाने ‘इंडस्ट्रियल अकॅडेमीया समिट’ (उद्योग-शैक्षणिक संस्था शिखर परिषद) मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या परिषदेत नांदेड परिसरातील नामांकित कंपनीचे उद्योजक मनोज लोहिया, मोहित जाजू, गोदावरी ड्रग्स नांदेडचे संचालक गिरीश देशपांडे, जिल्हा उद्योग केंद्र नांदेडचे संतोष चव्हाण, सुप्रीम गोल्ड, नांदेडचे मारोती मोरे, विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मनोहर चासकर, विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, विज्ञान आणि तंत्रज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, वित्त व लेखाधिकारी डॉ. राजेश शिंदे, संकुलातील सर्व प्राध्यापक आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन उद्योग क्षेत्रातील मान्यवर आणि विद्यापीठातील संवैधानिक अधिकारी यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले. यासोबत पूज्य स्वामी रामानंद तीर्थ आणि भारताचे पूर्व राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून सादर कार्यक्रमात त्यांच्या संशोधन क्षेत्रातील योगदानाचे स्मरण करण्यात आले.

संकुलाचे संचालक डॉ. राजेश टाले यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर करताना, या परिषदेचा उद्देश म्हणजे उद्योग आणि शैक्षणिक क्षेत्रातील दरी मिटवणे, विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्रात भरीव कामगिरी करण्यासाठी आवश्यक असलेल्या कौशल्यांची माहिती करून देणे आणि शैक्षणिक क्षेत्रातील संशोधनाचे नवोक्रमात परिवर्तन करणे, असल्याचे प्रतिपादन केले.

मनोज लोहिया आणि मोहित जाजू यांनी उद्योग क्षेत्रातील, विशेषत: नांदेड परीक्षेत्रातील उपलब्ध संधीबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. उद्योग व्यवसायात पदार्पण करताना विद्यार्थ्यांना आवश्यक असलेल्या ज्ञान आणि प्रयोगिक कौशल्यांचा ऊहापोह केला. संतोष चव्हाण यांनी नवीन कल्पनेवर उद्योगाची (startup) सुरुवात करण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेगवेगळ्या सरकारी योजनांची माहिती देत विद्यार्थ्यांना त्यासाठी प्रोत्साहित केले. मारोती मोरे यांनी सूप्रीम गोल्ड कंपनीची माहिती देतांना विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्रातील रोजगार आणि कामाचे नियोजन यासंबंधी मार्गदर्शन केले.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी दिलेल्या संदेशाचे विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात अनुकरण करावे असे मार्गदर्शन केले. तसेच नांदेड परीक्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी उद्योग जगतातील मान्यवरांनी संधी उपलब्ध करून देण्याविषयी विनंतीपर सूचना केल्या.

या कार्यक्रमासाठी संकुलाचे संचालक डॉ. राजेश टाले, डॉ. संगीता माकोने, डॉ. संतोष देवसरकर, डॉ. अविनाश पुयड, डॉ. जी. कृष्णा चैतन्या, डॉ. ज्ञानेश्वर वानखेडे, डॉ. ओमप्रकाश येमुल आणि संकुलातील शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. सदर कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि सहकार्य लाभले. शेवटी आलेल्या सर्व पाहुण्यांचे आभार मानून कार्यक्रम संपन्न झाला असे जाहीर करण्यात आले.

# शालेय क्रीडा आरक्षणातील बदल तातडीने मागे घ्या; ऑलिम्पिक असोसिएशनची मागणी



**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागाने ५ ऑक्टोबर २०२६ रोजी क्रीडा आरक्षणाबाबत काढलेल्या शासन निर्णयातील बदलामुळे १४ व १७ वर्षांखालील शालेय क्रीडा स्पर्धांमधील पदकविजेत्या खेळाडूंवर अन्याय होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे या वयोगटातील पात्र पदकविजेत्यांना पूर्वीप्रमाणे ५ टक्के क्रीडा आरक्षणाचा लाभ कायम ठेवावा, अशी आक्रमक मागणी ऑलिम्पिक असोसिएशन, नांदेडच्या वतीने करण्यात आली आहे.

ऑलिम्पिक असोसिएशनचे अध्यक्ष तथा गुणवंत क्रीडा संघटक पुरस्कार विजेते डॉ. हंसराज वैद्य, चेअरमन जे. ई. गोपिले आणि महासचिव बालाजी जोगदंड यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले.

क्रीडा आरक्षणामुळे गुणवंत खेळाडूंना शासकीय, निमशासकीय तसेच इतर क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध होत असून, अनेक खेळाडूंना क्रीडा क्षेत्रात पुढे जाण्यास प्रोत्साहन मिळाले आहे. विशेषतः १४ व १७ वर्षांखालील वयोगट हा खेळाडूंच्या कारकिर्दीतील अत्यंत महत्त्वाचा टप्पा मानला जातो. या वयात खेळाडू जिल्हा, विभाग, राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर आपल्या कौशल्याची छाप पाडतात. मात्र, नव्या पात्रता निकषांमुळे शालेय स्तरावर पदके मिळवणाऱ्या गुणवंत खेळाडूंच्या भविष्यातील संधी मर्यादित होण्याची भीती असोसिएशनने व्यक्त केली आहे.

ग्रामीण, दुर्गम आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील अनेक खेळाडू अत्यल्प सुविधा असतानाही कठोर परिश्रम करून राज्य व राष्ट्रीय स्तरावर यश संपादन करतात. अशा खेळाडूंना शासकीय नोकरीतील आरक्षणाची हमी नसेल तर पालकांचा क्रीडा क्षेत्राकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलू शकतो, परिणामी सामान्य कुटुंबांतील गुणवंत खेळाडूंच्या क्रीडा प्रवासाला खीळ बसण्याची शक्यता असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

# रुग्ण सेवा मंडळाच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त मोफत नेत्र व रक्तगट तपासणी शिबिराचे आयोजन

**देगलूर (प्रतिनिधी)–** देगलूर शहर व परिसरातील गरीब व गरजू शेतकरी - शेतमजूर लोकांना नाममात्र दरात आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी म्हणून ज्येष्ठ हृदयरोगतज्ज्ञ तथा माजी खासदार डॉ. व्यंकटेश काब्दे यांनी अमेरिकेत वैद्यकीय शिक्षण घेऊन आल्याननंतर मुंबईची मोठ्या हॉस्पिटलची संधी नाकारून त्यांनी देगलूरच्या सीमावर्ती भागातील गरीब लोकांची सेवा करण्यासाठी दि. २ ऑक्टोबर १९७७ रोजी रुग्ण सेवा मंडळ ही संस्था स्थापन केली.

या संस्थेने अविरत रुग्ण सेवा करून मागील ४९ वर्षात हजारो गरीब लोकांच्या जीवनात आनंद फुलविन्याचे कार्य केले आहे. मराठवाड्यातील आरोग्य सेवा देणारी जुनी व दानशूर लोकांच्या दानावर चालणारी एक संस्था असून २०२६-२०२७ हे वर्ष रूग्ण सेवा मंडळाचे ‘सुवर्ण महोत्सवी वर्ष’ म्हणून साजरा करण्यात येत आहे. त्यानिमित्त दि. १७ ऑक्टोबर २०२६ रोजी विद्यार्थ्यासाठी मोफ़त मोफत नेत्र व रक्तगट तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रस्तुत मोफत नेत्र तपासणी व रक्तगट तपासणी शिबिराचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन रुग्ण सेवा मंडळाचे अध्यक्ष ज्येष्ठ हृदयरोग तज्ज्ञ डॉ. व्यंकटेश रुक्माजी काब्दे, उपाध्यक्ष देवेंद्र बालाजीराव मोतेवार, सचिव सूर्यकांत नारलावार, सहसचिव प्रा. डॉ. बालाजी कत्तुरवार व कोषाध्यक्ष प्रा. विठ्ठल चिंतावार, केंद्रीय कार्यकारी मंडळ सदस्य रामचंद्र दाभडकर, डॉ. अजित काब्दे, मधुकर नारलावार, लक्ष्मीकांत पदमवार, नंदकिशोर दाशेटवार, रमेश नारलावार, मारुती गायकवाड, मुरलीधर वट्टमवार, विजय चालिकवार व व्यंकट कांबळे यांनी केले आहे.

# दुष्काळग्रस्त बळीराजाच्या पाठीशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस खंबीरपणे उभे राहतील -जिल्हाध्यक्ष ॲड. किशोर देशमुख



**अर्धापूर (प्रतिनिधी)–** राज्यात भीषण दुष्काळाचे संकट असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी ५ हजार रुपयांची अग्रिम आर्थिक मदत देऊन बळीराजासाठी दिलासा देणारा निर्णय घेतला असल्याची माहिती भाजप जिल्हाध्यक्ष ॲड किशोर देशमुख दिली आहे.

दुष्काळामुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान पूर्णपणे भरून निघणार नाही. बळीराजाने घेतलेले कष्ट, वाया गेलेले पीक आणि त्यांच्यावर आलेले आर्थिक संकट याची भरपाई केवळ पैशांत होऊ शकत नाही. मात्र संकटाच्या काळात सरकार आपल्या पाठीशी उभे आहे, हा विश्वास शेतकऱ्यांसाठी मोठा आधार आहे. राज्यातील महायुती सरकारने यापूर्वीही शेतकऱ्यांना कर्जमाफी, पिकविमा, कृषी पंपांच्या ४८००० कोटी वीज बील माफी, दुष्काळ घोषित तालुक्यात कर्जवसुलीच्या तगाद्यापासून संरक्षण अशा अनेक निर्णयांद्वारे मदतीचा हात दिला आहे. तसेच पीएम किसान सन्मान निधीसोबत राज्य सरकारच्या सहभागातून नमो शेतकरी महासन्मान निधीच्या माध्यमातूनही शेतकऱ्यांना आर्थिक आधार देण्याचे काम सुरू आहे. तसेच विद्यार्थ्यांची परीक्षा फीस माफ केली आहे. दुष्काळात दिवाळीपूर्वी ५ हजार रुपयांची ही मदत अंतिम मदत नसून अग्रिम मदत आहे. पुढील पंचनामे व शासनाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर दुष्काळामुळे झालेल्या नुकसानीचा योग्य आढावा घेऊन शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात अतिरिक्त आर्थिक दिलासा देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकार निश्चितपणे पुढाकार घेईल, असा ठाम विश्वास ॲड. देशमुळ यांनी व्यक्त केला आहे.

# विज्ञान प्रदर्शन एक सोहळा न राहता तो सृजनाचा मेळावा बनावा -डॉ. अमोल निळेकर

## ५४ व्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनास उत्कृष्ट प्रतिसाद



**नांदेड (प्रतिनिधी)–** अशात विज्ञान प्रदर्शन म्हटले की तो एक प्रकल्प सादरीकरणाचा सोहळा होताना दिसतो, प्रत्यक्षात तो विद्यार्थ्यांच्या नवनवीन कल्पनांचा, सृजनाचा मेळावा होणे अभिप्रेत असते, असे मत डॉ. अमोल निळेकर यांनी व्यक्त केले. नांदेड येथील श्री चैतन्य ई-टेक्नो स्कूलमध्ये तालुकास्तरीय ५४ व्या विज्ञान प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी विचारमंचावर प्राथमिक शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, माध्यमिक शिक्षणाधिकारी माधव सलगर, शिक्षणाधिकारी (योजना) दिलीप बनसोडे, मनपाच्या शिक्षणाधिकारी प्रवीणा मांदळे, गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती नांदेड, सुधीर गुट्टे, श्री चैतन्य स्कूलचे एजीएम शिवकुमार अन्नदानम, चैतन्य स्कूलच्या मुख्याध्यापिका नीलिमा शुक्ला आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले, बालवैज्ञानिकांनी मानवी आयुष्यातील समस्यांचा चिकित्सक पद्धतीने विचार करत त्या समस्यांची उकल करताना मानव जातीचा शाश्वत विकास कसा साधला जाईल अशा पद्धतीचे संशोधन करण्याकडे लक्ष द्यायला हवे. विद्यार्थ्यांना सातत्याने हे असे का? ते तसे का? असे प्रश्न पडत राहिले पाहिजे. जागतिक पातळीवर देण्यात येणाऱ्या नोबेल पुरस्कारांमध्ये १९३० मध्ये सी व्हीरमण यांना देण्यात आलेल्या नोबेल पुरस्कारानंतर एकाही भारतीय संशोधकाला नोबेल पुरस्कार प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. हे असे होण्याचे कारण आपण चिकित्सक बुद्धीने विचार करत नाही. त्यासाठी शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र बदल करतानाच विद्यार्थ्यांच्या एकंदर विचारसरणी मध्येसुद्धा तितकेच बदल होण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.

माध्यमिक शिक्षणाधिकारी माधव सलगर यांनी, प्रत्येक बालकात वैज्ञानिक लपलेला असून अशा विज्ञान प्रदर्शनाच्या माध्यमातून त्यांना अभिव्यक्त होण्याची संधी मिळत असल्याचे नमूद केले. अशा पद्धतीने केवळ सहभागी न होता प्रत्यक्ष जीवन व्यवहार जगताना वैज्ञानिक दृष्टिकोन जगण्याचे आवाहन त्यांनी यावेळी उपस्थितांना केले.

या प्रसंगी विद्यार्थ्यांच्या उच्च प्राथमिक स्तर, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरातील सुमारे २०० स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. तसेच प्रयोगशाळा सहाय्यक परिचर, प्राथमिक शिक्षक आणि माध्यमिक शिक्षक या गटातूनसुद्धा अनेक स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. गटशिक्षणाधिकारी सुधीर गुट्टे यांनी, हे प्रदर्शन म्हणजे येणाऱ्या काळातील वैज्ञानिक निर्माण करण्याची कार्यशाळा असून याठिकाणी सहभागी सर्व बाल वैज्ञानिकांनी स्वतःच्या प्रयोगाबरोबरच इतरही स्पर्धकांच्या प्रयोगांची निरीक्षण करावे, प्रयोग करत राहिल्याने नवनवीन शोधांचा जन्म होतो असे सांगत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

# किनवटमध्ये ‘एक शाम एकता के नाम’ ऑल इंडिया मुशायरा उत्साहात

## देशभरातील नामांकित शायरांच्या रचनांनी रसिक मंत्रमुग्ध; सामाजिक सलोखा आणि राष्ट्रीय एकतेचा संदेश




**किनवट (प्रतिनिधी)–** सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि राष्ट्रीय एकतेचा संदेश देणारा ‘एक शाम एकता के नाम’ हा भव्य ऑल इंडिया मुशायरा किनवट येथील सुभाषनगरमधील व्ही.आर. गार्डन येथे मंगळवारी, दि. १३ ऑक्टोबर रोजी रात्री उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या मुशायऱ्याचे हे दुसरे वर्ष असून, देशभरातील नामांकित शायरांच्या दमदार रचना आणि प्रभावी सादरीकरणामुळे उपस्थित काव्यरसिकांना अविस्मरणीय साहित्यिक मेजवानी अनुभवायला मिळाली.

या मुशायऱ्यात मुंबईचे शकील आझमी, सहारनपूरचे बिलाल सहारनपुरी, भुसावळचे हामिद भुसावली, अकोल्याचे नईम फराझ, आकोटचे एजाझ बिस्मिल, मालेगावचे मुजावर मालेगांवी, नांदेडचे अलतमश तालीब, किनवटचे तौहिद मलनस तसेच औरंगाबादचे ॲड. साद मलीक, बिलाल अनवर आणि उझेर मुहिब या नामांकित शायरांनी आपल्या प्रभावी रचना सादर केल्या. त्यांच्या शायरीतून प्रेम, माणुसकी, सामाजिक ऐक्य, बंधुभाव आणि राष्ट्रीय एकतेचे विविध पैलू उलगडले.

इंदूरचे सुप्रसिद्ध सूत्रसंचालक सतलज इंदोरी यांनी मुशायऱ्याचे प्रभावी संचालन (निझामत) करत कार्यक्रमात रंगत आणली. त्यांच्या खास शैलीतील निवेदनामुळे शायर आणि रसिकांमधील संवाद अधिक रंगतदार झाला.

भाजपा अल्पसंख्याक आघाडीचे नांदेड जिल्हाध्यक्ष ॲड. माज़ बडगुजर यांच्या पुढाकारातून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. किनवट व परिसरातील काव्यप्रेमी, साहित्यरसिक, अधिकारी, वकील, लोकप्रतिनिधी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी शायरांच्या रचनांना उत्स्फूर्त दाद देत कार्यक्रमाला भरभरून प्रतिसाद दिला.

‘एक शाम एकता के नाम’ या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या मुशायऱ्याने साहित्याच्या माध्यमातून समाजात एकता, प्रेम आणि बंधुभावाचा संदेश देण्याचा प्रयत्न केला. विविध भाषा, विचार आणि संस्कृतींना जोडणाऱ्या शायरीच्या माध्यमातून सामाजिक सलोखा अधिक दृढ करण्याचा संदेश देत हा साहित्यिक सोहळा उत्साहात संपन्न झाला.

# तंत्रमंत्र
विज्ञानयुगातील बितंबातम्या

# आता ठसे चोरीचा धोका कमी होणार!

## अल्ट्रासाऊंड तंत्रज्ञानामुळे माहिती साठविल्याशिवाय उघडणार उपकरणे

**स्मार्टफोन अनलॉक करण्यापासून ते ऑनलाइन व्यवहार आणि कार्यालयातील उपस्थिती नोंदविण्यापर्यंत अनेक ठिकाणी बोटांच्या ठशांचा वापर केला जातो. मात्र, या ठशांची डिजिटल माहिती चोरीला गेल्यास ती बदलता येत नाही. या समस्येवर उपाय शोधण्यासाठी संशोधकांनी अल्ट्रासाऊंडवर आधारित नवे जैवमितीय प्रमाणीकरण तंत्रज्ञान विकसित केले आहे. या तंत्रज्ञानाद्वारे बोटांच्या ठशांची डिजिटल प्रतिमा किंवा माहिती साठवून न ठेवता व्यक्तीची ओळख पटविणे शक्य होऊ शकते.**

### बोटांच्या ठशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न

भारतासह जगभरातील अनेक देशांमध्ये बोटांच्या ठशांद्वारे व्यक्तीची ओळख पडताळली जाते. स्मार्टफोन, डिजिटल उपकरणे आणि विविध सुरक्षा यंत्रणांमध्ये या तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. मात्र, पारंपरिक पद्धतीत बोटांच्या ठशांशी संबंधित डिजिटल माहिती साठवली जाते. ही माहिती गळतीमुळे किंवा सायबर हल्ल्यामुळे चोरीला गेल्यास संबंधित व्यक्तीसमोर सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतो. संकेतशब्द चोरीला गेल्यास तो बदलता येतो; मात्र बोटांचे ठसे नैसर्गिकरीत्या बदलता येत नसल्यामुळे त्यांच्या माहितीची सुरक्षितता अधिक महत्त्वाची ठरते.



### सध्याचे तंत्रज्ञान कसे काम करते?

सध्याच्या बोटांचे ठसे ओळखणाऱ्या यंत्रणेत व्यक्तीने संवेदकावर बोट किंवा अंगठा ठेवल्यानंतर त्याच्या ठशांची डिजिटल रचना तयार केली जाते. त्यानंतर ही रचना आधी साठवलेल्या माहितीशी जुळवून पाहिली जाते. दोन्ही रचना जुळल्यास संबंधित उपकरण सुरू होते किंवा त्याचा वापर करण्याची परवानगी मिळते. या प्रक्रियेत डिजिटल माहिती साठवली जात असल्यामुळे तिच्या सुरक्षिततेबाबत प्रश्न निर्माण होतात. विशेषतः, ही माहिती अनधिकृत व्यक्तीच्या हाती लागल्यास तिचा गैरवापर होण्याची शक्यता असते.

### अल्ट्रासाऊंड तंत्रज्ञान कसे काम करणार?

नव्या तंत्रज्ञानात बोटांच्या ठशांची डिजिटल प्रतिमा तयार करून ती साठविण्याऐवजी अल्ट्रासाऊंडच्या साहाय्याने ओळख पडताळण्याची पद्धत वापरली जाते. यामध्ये बोट आणि संवेदक यांच्यातील परस्पर संवादातून निर्माण होणाऱ्या ध्वनिलहरींच्या प्रतिसादाचा उपयोग केला जातो. नोंदणीकृत व्यक्तीने बोट संवेदकावर ठेवल्यास ध्वनिलहरी अपेक्षित भागातून प्रवास करतात. मात्र, दुसऱ्या व्यक्तीने बोट ठेवल्यास लहरींचा प्रतिसाद वेगळा असतो. या फरकाच्या आधारे व्यक्तीची ओळख पडताळता येते. या पद्धतीचे वैशिष्ट्य म्हणजे बोटांच्या ठशांची डिजिटल प्रतिमा किंवा पारंपरिक स्वरूपातील ठशांची माहिती साठविण्याची गरज टाळण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे चोरी करण्यासाठी अशा स्वरूपातील माहिती उपलब्धच राहणार नाही, अशी या तंत्रज्ञानामागील संकल्पना आहे.



### भविष्यात काय बदल होऊ शकतो?

अल्ट्रासाऊंडवर आधारित हे तंत्रज्ञान प्रत्यक्ष वापरासाठी विकसित झाले आणि त्याची सुरक्षितता व विश्वासार्हता व्यापक चाचण्यांतून सिद्ध झाली, तर जैवमितीय प्रमाणीकरणाच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण बदल घडू शकतो. स्मार्टफोन, संगणक आणि अन्य सुरक्षितता यंत्रणांमध्ये बोटांच्या ठशांची माहिती साठविण्याची गरज कमी होऊ शकते. मात्र, हे तंत्रज्ञान सर्व उपकरणांमध्ये वापरण्यासाठी उपलब्ध होण्यापूर्वी त्याची अधिक व्यापक चाचणी, सुरक्षिततेची पडताळणी आणि व्यावहारिक उपयुक्तता तपासणे आवश्यक ठरणार आहे.

# लॅपटॉप ऑनलाइन खरेदी करावा की दुकानात जाऊन?

## दोन्ही पर्यायांचे फायदे-तोटे जाणून घ्या...

**नवीन लॅपटॉप खरेदी करताना तो ऑनलाइन मागवावा की प्रत्यक्ष दुकानात जाऊन खरेदी करावा, असा प्रश्न अनेकांना पडतो. दोन्ही पर्यायांचे काही फायदे आणि मर्यादा आहेत. ऑनलाइन खरेदीमध्ये आकर्षक सवलती मिळू शकतात, तर प्रत्यक्ष दुकानातून खरेदी करताना लॅपटॉपची गुणवत्ता, रचना आणि कार्यक्षमता तपासण्याची संधी मिळते. त्यामुळे कोणता पर्याय निवडावा, हे खरेदीदाराचे बजेट, गरजा आणि पसंती यावर अवलंबून असते.**



### कोणती काळजी घ्यावी?

ऑनलाइन खरेदीमध्ये काही धोकेही असतात. लॅपटॉप घरपोच आल्यानंतर त्याचा पडदा, बाह्य भाग किंवा अन्य घटक खराब असल्याचे आढळल्यास तक्रार नोंदविण्याची आणि बदलून घेण्याची प्रक्रिया त्रासदायक ठरू शकते. त्यामुळे वितरणाच्या वेळी उपकरणाची तपासणी करणे महत्त्वाचे आहे. काही विक्रेते जुन्या उत्पादन तारखेचे, अधिकृत विक्रीसाठ्यातून काढून टाकलेले किंवा भारतीय बाजारपेठेसाठी अधिकृतरीत्या उपलब्ध नसलेले मॉडेल विक्रीसाठी ठेवू शकतात. त्यामुळे केवळ कमी किमतीच्या आमिषाला बळी न पडता विक्रेत्याची विश्वासार्हता, उत्पादनाची माहिती आणि हमीच्या अटी तपासल्या पाहिजेत.

### या बाबी लक्षात ठेवा...

» उत्पादनाची तारीख तपासा : लॅपटॉपचे उत्पादन कधी झाले आहे, हे शक्य असल्यास विक्रेत्याकडून किंवा कंपनीकडून पडताळून घ्या.

» विक्रेत्याची विश्वासार्हता पाहा : अधिकृत विक्रेता किंवा विश्वासार्ह विक्रीसंकेतस्थळाला प्राधान्य द्या.

» हमीच्या अटी वाचा : उत्पादनाला भारतात वैध कंपनीची हमी मिळते का, हे तपासा.

» परतावा आणि बदल धोरण समजून घ्या : उपकरण खराब आल्यास किंवा अपेक्षेप्रमाणे नसल्यास काय करता येईल, याची माहिती घ्या.

» वितरणावेळी तपासणी करा : शक्य असल्यास लॅपटॉप मिळताच त्याचा बाह्य भाग, पडदा आणि कार्यक्षमता तपासा. पॅकेजिंग व पावतीही जपून ठेवा.

### दुकानातून लॅपटॉप खरेदी करण्याचे फायदे

प्रत्यक्ष दुकानातून लॅपटॉप खरेदी करण्याचा सर्वांत मोठा फायदा म्हणजे उपकरणाची प्रत्यक्ष तपासणी करता येते. लॅपटॉपचा आकार, वजन, पडद्याची गुणवत्ता, कळफलक, टचपॅड आणि त्याच्या वापरातील सुलभता यांचा अनुभव घेता येतो. त्यामुळे आपल्या गरजेनुसार योग्य उपकरण निवडणे सोपे होते. एका खरेदीदाराने आपल्या नातेवाइकासाठी एक लाख रुपयांच्या आत १४ इंचांचा, वजनाने हलका लॅपटॉप खरेदी करण्याचे ठरविले. ऑनलाइन विविध पर्याय तपासल्यानंतर त्यांनी प्रत्यक्ष दुकानांमध्ये जाऊन अनेक उपकरणांची पाहणी केली. अखेरीस एचपी कंपनीचा लॅपटॉप खरेदी केला. या खरेदीदाराच्या अनुभवानुसार, संबंधित लॅपटॉपवर यूपीआयद्वारे पैसे भरल्यास पाच हजार रुपयांची, तर कार्डद्वारे पैसे भरल्यास अडीच हजार रुपयांची सवलत मिळत होती. अखेरीस १६ जीबी रॅम आणि ५१२ जीबी साठवण क्षमता असलेला २०२६ मधील १४ इंचांचा लॅपटॉप त्यांना ७२ हजार रुपयांना मिळाला. याशिवाय, १,९९९ रुपये देऊन दोन वर्षांची अतिरिक्त हमीही घेण्यात आली. लॅपटॉपसोबत पिशवी, माऊस, कळफलकासाठी संरक्षक आच्छादन आणि स्वच्छतेसाठी लागणारे साहित्यही मिळाले. या उदाहरणावरून प्रत्यक्ष दुकानात खरेदी करतानाही चांगली सवलत मिळू शकते, हे स्पष्ट होते. मात्र, सवलतींच्या अटी आणि अतिरिक्त सुविधांची उपलब्धता प्रत्येक दुकानानुसार वेगळी असू शकते.

### दुकानातून खरेदी करण्याच्या मर्यादा

प्रत्यक्ष दुकानांमध्ये प्रामुख्याने अलीकडे बाजारात आलेल्या लॅपटॉपची विक्री केली जाते. त्यामुळे जुन्या मॉडेलचा शोध घेणाऱ्या ग्राहकांना अपेक्षित उपकरण मिळेलच असे नाही. दुसरीकडे, जुन्या मॉडेलवर ऑनलाइन अधिक सवलत मिळण्याची शक्यता असते. तथापि, केवळ कमी किमतीचा विचार न करता लॅपटॉपच्या उत्पादनाची तारीख, हमीचा कालावधी आणि तांत्रिक वैशिष्ट्ये तपासणे आवश्यक आहे.

### ऑनलाइन लॅपटॉप खरेदी करण्याचे फायदे

ॲमेझॉन आणि फ्लिपकार्ट यांसारख्या संकेतस्थळांवर अनेकदा आकर्षक सवलती, बँक कार्डांवरील सूट आणि सणासुदीच्या विशेष विक्रीच्या योजना उपलब्ध असतात. प्रत्यक्ष दुकानात उपलब्ध नसलेले जुने मॉडेल किंवा विशिष्ट वैशिष्ट्यांचा लॅपटॉप ऑनलाइन शोधणेही तुलनेने सोपे ठरते. त्यामुळे ठरावीक बजेटमध्ये अधिक पर्याय तपासता येतात.

### मग लॅपटॉप कुठून खरेदी करावा?

तुम्हाला बाजारात नव्याने आलेला लॅपटॉप खरेदी करायचा असेल आणि खरेदीपूर्वी त्याचा प्रत्यक्ष अनुभव घ्यायचा असेल, तर अधिकृत दुकानातून खरेदी करणे सोयीचे ठरू शकते. कंपनीच्या अधिकृत संकेतस्थळावरही उपलब्ध सवलती आणि हमीच्या अटी तपासता येतात. दुसरीकडे, तुम्हाला विशिष्ट जुने मॉडेल हवे असेल किंवा ऑनलाइन मोठी सवलत मिळत असेल, तर ऑनलाइन खरेदीचा पर्याय विचारात घेता येईल. मात्र, अशा वेळी विक्रेत्याची विश्वासार्हता, उत्पादनाची तारीख आणि हमी यांची विशेष काळजी घ्यावी. थोडक्यात सांगायचे तर, लॅपटॉप खरेदी करताना केवळ किंमत पाहून निर्णय घेऊ नका. आपल्या गरजा, उपकरणाची तांत्रिक वैशिष्ट्ये, उत्पादनाची तारीख, हमी आणि विक्रीनंतर मिळणारी सेवा यांची तुलना करा. या सर्व बाबींचा विचार करूनच योग्य लॅपटॉप आणि खरेदीचा पर्याय निवडा.



# अनोळखी व्यक्तीने पाठवले फ्रीज, टीव्ही किंवा महागड्या वस्तूंचे 'कॅश ऑन डिलिव्हरी' पार्सल?

**ऑनलाइन खरेदीच्या वाढत्या प्रमाणामुळे घरबसल्या वस्तू मागविणे सोपे झाले आहे. मात्र, याच सुविधेचा गैरवापर करून एखादी व्यक्ती तुमच्या पत्त्यावर तुमच्या संमतीशिवाय महागड्या वस्तूंची मागणी नोंदवू शकते. अशा वेळी संबंधित वस्तूंचे पैसे देण्याचा दबाव तुमच्यावर आणला जाऊ शकतो. फ्रीज, टीव्ही यांसारख्या महागड्या वस्तूंची 'कॅश ऑन डिलिव्हरी' (वस्तू मिळाल्यानंतर पैसे देणे) पद्धतीने अनोळखी मागणी तुमच्या घरी पोहोचू लागली, तर काय करावे, असा प्रश्न पडणे स्वाभाविक आहे.**

तामिळनाडूतील मदुराई येथील वीरमणी या समाजमाध्यमांवरील प्रभावकासोबत असाच प्रकार घडला. दिवाळीनिमित्त मिठाई पाठविण्याचे आवाहन करताना त्यांनी आपला पत्ता ऑनलाइन जाहीर केला. त्यानंतर त्यांच्या पत्त्यावर महागड्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या मागण्या नोंदविल्या जाऊ लागल्या. या घटनेमुळे वैयक्तिक माहिती ऑनलाइन उघड केल्यास तिचा गैरवापर कसा होऊ शकतो, हे पुन्हा एकदा समोर आले आहे. अशा प्रकाराला डिजिटल छळाचा प्रकार मानले जाऊ शकते. मात्र, अनोळखी पार्सल आले म्हणजे प्रत्येक वेळी फसवणूकच आहे, असे गृहीत न धरता त्याची योग्य पडताळणी करणे महत्त्वाचे आहे.




### ओटीपी देऊ नका, पैसेही भरू नका

तुम्ही मागविलेली नसलेली वस्तू स्वीकारण्यासाठी कोणी दबाव आणत असेल, तर त्याला बळी पडू नका. पार्सल रद्द करण्यासाठी किंवा वितरण थांबविण्यासाठी ओटीपी मागितला जात असल्यास तो कोणालाही सांगू नका. विशेषतः बँकिंग व्यवहारांशी संबंधित ओटीपी किंवा अन्य गोपनीय माहिती अनोळखी व्यक्तीला देऊ नका. वस्तू स्वीकारण्यापूर्वी तिची मागणी आपणच नोंदविली आहे का, याची खात्री करा. अनोळखी व्यक्तीच्या दबावाखाली पैसे भरणे टाळा. मात्र, वैध मागणी किंवा कराराशी संबंधित काही वाद असल्यास त्याची स्वतंत्रपणे पडताळणी करा.

### वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवा

मोबाइल क्रमांक, घराचा पत्ता आणि पूर्ण नाव ही महत्त्वाची वैयक्तिक माहिती आहे. समाजमाध्यमांवर किंवा अनोळखी संकेतस्थळांवर ही माहिती उघड करताना काळजी घ्या. अनोळखी दुव्यांवर क्लिक करून वैयक्तिक तपशील भरू नका. अशा माहितीचा वापर फसवणूक किंवा छळासाठी केला जाऊ शकतो. ऑनलाइन मागविलेल्या वस्तूंच्या खोक्यांची विल्हेवाट लावताना त्यावरील नाव, पत्ता आणि मोबाइल क्रमांक असलेली माहिती वाचता येणार नाही, याचीही काळजी घ्या.

### अनोळखी पार्सल स्वीकारू नका

तुम्ही मागणी नोंदविली नसताना एखादे पार्सल घरी आल्यास ते स्वीकारण्याची किंवा त्यासाठी पैसे देण्याची घाई करू नका. वितरण करणाऱ्या कर्मचाऱ्याला आपण ही वस्तू मागविलेली नसल्याचे स्पष्ट सांगा आणि संबंधित मागणी रद्द करण्याची विनंती करा. वितरण करणारा कर्मचारी आपल्या प्रणालीमध्ये ही बाब नोंदवू शकतो. पार्सल स्वीकारण्यापूर्वी मागणीची माहिती आणि विक्रेत्याचे तपशील तपासणे योग्य ठरेल.

» संबंधित कंपनीच्या ग्राहकसेवेशी संपर्क साधा : तुमच्या पत्त्यावर वारंवार अनोळखी मागण्यांची पार्सले येत असतील, तर संबंधित ऑनलाइन खरेदी संकेतस्थळाच्या ग्राहकसेवा विभागाशी संपर्क साधा. संपूर्ण प्रकाराची माहिती देऊन तक्रार नोंदवा. तुमच्या पत्त्याचा गैरवापर होत असल्याची शक्यता असल्याने आवश्यक ती तपासणी करण्याची विनंती करा. वारंवार अशा मागण्या येत असल्यास तुमच्या पत्त्यावर होणाऱ्या वितरणाबाबत अतिरिक्त पडताळणी करता येईल का, याचीही संबंधित कंपनीला विचारणा करा. तक्रारीचा क्रमांक आणि कंपनीशी झालेल्या संवादाची नोंद जतन करून ठेवा.

» सायबर हेल्पलाइन आणि पोलिसांची मदत घ्या : वारंवार अनधिकृत मागण्या नोंदवून तुम्हाला त्रास दिला जात असेल, तर संबंधित पार्सलची माहिती, संदेश, पावत्या, वितरणाच्या नोंदी आणि इतर उपलब्ध पुरावे जतन करा. त्यानंतर पोलिसांकडे तक्रार दाखल करा. सायबर गुन्ह्याशी संबंधित तक्रार करण्यासाठी केंद्र सरकारच्या cybercrime.gov.in या संकेतस्थळाचा वापर करता येतो. आर्थिक फसवणूक झाल्यास १९३० या राष्ट्रीय सायबर गुन्हे हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधता येतो.



» लक्षात ठेवा : तुमच्या नावाने किंवा पत्त्यावर नोंदविलेली प्रत्येक ऑनलाइन मागणी खरी असेलच असे नाही. त्यामुळे अनोळखी पार्सल स्वीकारण्यापूर्वी त्याची खातरजमा करा. वैयक्तिक माहिती उघड करताना सावध राहा, ओटीपी कोणालाही देऊ नका आणि वारंवार त्रास होत असल्यास संबंधित कंपनी तसेच पोलिसांची मदत घ्या. योग्य वेळी घेतलेली खबरदारी तुम्हाला आर्थिक नुकसान आणि डिजिटल छळापासून वाचविण्यास मदत करू शकते.

महायुतीतील तिन्ही पक्षांचा एकमेकांना चेकमेट करण्याचा प्रयत्न?

# अमरावतीमुळे छत्रपती संभाजीनगरमध्ये अन् पुण्यात युतीत बिघाडी, आता भाजप-शिवसेनेचे मोठे नेते मैदानात



**मुंबई (प्रतिनिधी)-** राज्यातील विधान परिषदेच्या निवडणुकीत महायुतीतील मतभेद पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. अमरावतीमध्ये शिवसेनेच्या उमेदवारासमोर भाजपचा बंडखोर निवडणुकीच्या रिंगणात आहे. अमरावतीत शिक्षक मतदारसंघातभाजपचे बंडखोर दिलीप कडूंनी शिवसेनेचे अधिकृत उमेदवार किरण सरनाईक यांच्यासमोर आव्हान उभं केलं आहे. दरम्यान, महायुतीतील बंडखोरी आणि त्यामुळे मित्र पक्षामधील डोकेदुखीच्या थेट फटका भाजप-शिवसेनेच्या अधिकृत उमेदवाराला बसण्याची शक्यता आहे. परिणामी अमरावतीमधील बंडखोरी शमविण्यासाठी महायुतीचे दोन दिग्गज नेते आता मैदानात उतरले आहे.

दरम्यान, राज्याचे महसूल मंत्री आणि भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे आणि शिवसेनेचे नेते आणि मंत्री उदय सामंत आज तातडीने अमरावतीमध्ये जाणार असल्याची माहिती आहे. तर महायुतीतील बंडखोरी शमविण्यासाठी दोन्हीं नेते प्रयत्न करणार आहेत. तर अमरावतीमधील बंडखोरी शमवण्यास यश आल्यास पुणेयाबाबत शिवसेना विचार करणार? असा प्रश्नही या निमित्याने उपस्थित झाला आहे. अशातच दोन्ही नेत्यांमधील समन्वयाच्या अभावामुळे विधानपरिषद निवडणुकीत दोन्ही पक्षातील संबंध ताणले गेल्याचे चित्र आता स्पष्ट झाले आहे. त्यामुळे महायुतीतील या नेत्यांच्या शिष्टाई फळाला येते का? हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.

दुसरीकडे, महायुतीतील तिन्ही पक्षांचा एकमेकांना चेकमेट करण्याचा प्रयत्न होत असल्याची चर्चा आहे. अमरावतीमुळे पुणे आणि छत्रपती संभाजीनगरमध्ये युतीत बिघाडी झाल्याचे बोललं जात आहे. परिणामी आता अमरावतीत भाजपचे बंडखोर उभे राहिल्याने पुणे शिक्षक मतदारसंघात शिवसेना सचिन सानप यांना पाठिंबा देणार. तर, अमरावतीत राष्ट्रवादी कांग्रेसने शिवसेनेला मदत केली तर संभाजीनगरमध्ये राष्ट्रवादी कांग्रेसला शिवसेना मदत करणार, अशी सूत्रांची माहिती आहे. त्यामुळे अमरावतीत भाजप आणि राष्ट्रवादीच्या बंडखोरांमुळे शिवसेनेची डोकेदुखी वाढाली आहे. तर अमरावतीत बंडखोरांना शमवण्यासाठी शिवसेनेकडूनही दबाव वाढला आहे. अशातच आता चंद्रशेखर बावनकुळे आणि उदय सामंत आज अमरावती दौऱ्यावर असून हा वाद शमवण्यासाठी हे दोन्ही नेते प्रयत्न करणार असल्याची माहिती आहे.

दरम्यान, आज महायुतीच्या घटक पक्षाची महत्वाची बैठक अमरावतीत पार पडणार आहे. ही बैठक काही अंशी वादळी ठरण्याची शक्यता तर आहेच. पण त्यावर बंडखोरीच्या डोकेदुखीवर महायुती काय तोडगा काढते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. यावेळी भाजपचे शेखर भोयर, संगीता शिंदे आणि सुमित पवार यांनी बंडखोरी केली तर शिवसेनेचे माजी आमदार श्रीकांत देशपांडे यांनी देखील बंडखोरी केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूरमध्ये भाजपचे बंडखोर अनिल सोले यांची नाराजी दूर केली. आता नागपूरमधला फार्मूला अमरावतीत वापरण्यात येणार का? अशी चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

दरम्यान, महायुतीच्या घटक पक्षाची बैठक झाल्यावर भाजपचे बंडखोर उमेदवारांना भेटण्यासाठी नेते मंडळी त्यांच्या घरी पण जातील अशी माहिती आहे. त्यांनतर अमरावती शहरातील सांस्कृतिक भवन याठिकाणी महायुतीचे अधिकृत उमेदवार किरण सरनाईक यांच्या प्रचारार्थ आयोजित भव्य कार्यकर्ता मेळावा होणार, ज्यामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार हे व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे मार्गदर्शन करणार आहेत. तसेच उद्योगमंत्री उदय सामंत, आदिवासी विकास मंत्री अशोक उईके आणि आमदार बच्चू कडू यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

## पुण्यात 'रॅपिडो'ची 'बाईक टॅक्सी' बंद; जिल्हाधिकाऱ्यांचे 'पुणे आरटीए'च्या बैठकीत आदेश

**पुणे (प्रतिनिधी)-** पुणे शहर परिसरात रॅपिडोची टू-व्हीलर टॅक्सी (बाईक टॅक्सी) सेवा रीतसर परवानगी मिळेपर्यंत बंद करण्याचे निर्दे श जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाच्या (आरटीए) बैठकीत दिले आहेत. शासनाची अधिकृत परवानगी न घेताच ही सेवा सुरू असल्याचा आक्रमक पवित्रा रिक्षा संघटनांनी घेतला होता.

'ओला', 'उबर', 'रॅपिडो' आदी ग्रिगेटर कंपन्यांविषयी प्राप्त झालेल्या विविध तक्रारींच्या पार्श्वभूमीवर पुणे 'आरटीए'ची संयुक्त बैठक पार पडली. या बैठकीला जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्यासह प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड, उप-प्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्निल भोसले, पिंपरी-चिंचवडचे उप-प्रादेशिक परिवहन अधिकारी राहुल जाधव, पिंपरी-चिंचवडचे वाहतूक पोलीस उपायुक्त विक्रांत देशमुख या प्रमुख अधिकाऱ्याशी विविध रिक्षा-कॅब संघटनांचे प्रतिनिधी आणि संबंधित प कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. रॅपिडोच्या बाईक टॅक्सी सेवेला शासनाकडून अद्याप कोणतीही कायदेशीर परवानगी मिळालेली नाही, त्यामुळे ही सेवा तातडीने बंद करण्यात यावी, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

## सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्यावरील टिप्पणी प्रकरणी संजय राऊतांना सुप्रीम कोर्टाची नोटीस

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)-** सर्वोच्च न्यायालयाने शिवसेना खासदार संजय राऊत यांच्याकडून सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या विरोधात केलेल्या वक्तव्याबद्दल स्पष्टीकरण मागितलं आहे. निवडणूक आयोग आणि एसआयआर मुद्द्यासंदर्भात इंडिया आघाडीच्या नेत्यांना भेटण्यास नकार दिल्याबद्दल राऊत यांनी सरन्यायाधीशांवर टीका केली होती. पत्रकार निखिल वागळे यांनाही नोटीस बजावण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालय बार असोसिएशनने दाखल केलेल्या फौजदारी अवमान याचिकेला प्रतिसाद म्हणून ही कारवाई करण्यात आली. संस्थांवरील हल्ले अत्यंत दुर्दैवी असल्याचे न्यायालयाने म्हटले आणि दोन्ही पक्षांविरुद्ध अवमान कारवाई का सुरू करू नये याचे स्पष्टीकरण देण्यास सांगितले. सर्वोच्च न्यायालयाने खासदार संजय राऊत आणि निखिल वागळे यांना पुढील सुनावणीत व्यक्तिशः हजर राहण्यापासून सूट दिली आहे. खंडपीठ प्रथम त्यांच्या उत्तरांचा विचार करेल.





११ ऑक्टोबर रोजी इंडिया आघाडीच्या शिष्टमंडळाला भेटण्याची सरन्यायाधीश सूर्यकांत यांची विनंती नाकारल्यानंतर हा वाद सुरू झाला. हा मुद्दा न्यायालयात याचिकेद्वारे मांडला जाऊ शकतो, असे सरन्यायाधीशांनी म्हटले होते. त्यानंतर संजय राऊत आणि निखिल वागळे यांनी सरन्यायाधीशांच्या निर्णयावर टीका केली. १२ ऑक्टोबर रोजी, राहुल गांधी यांच्यासह विरोधी पक्षांच्या नेत्यांनी सर्वोच्च न्यायालयावर मोर्चा काढला आणि एसआयआर विरोधात १३ याचिका दाखल केल्या.

१५ ऑक्टोबर रोजी सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांचा समावेश असलेले खंडपीठ, राहुल गांधी आणि संजय राऊत यांच्यासह इंडिया आघाडीच्या नेत्यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करत होते. वागळे यांनी त्यांच्या 'एक्स' (द) खात्यावरून सरन्यायाधीशांविरुद्ध अपमानजनक टिप्पणी केल्याचा आरोप करत एससीबीएने १५ ऑक्टोबर रोजी एक याचिका दाखल केली. नंतर त्यांनी ती टिप्पणी मागे घेतली. एससीबीएच्या मते, बॅडमिंटन स्पर्धेच्या नावाखाली दाखवलेले फोटो लंडनचे नसून, नोव्हेंबर २०२५ मध्ये दिल्लीच्या त्यागराज स्टेडियममध्ये झालेल्या एका स्पर्धेतील होते. सुनावणीदरम्यान, सरन्यायाधीशांनी सांगितले की, न्यायालयांनी नेहमीच वैयक्तिक स्वातंत्र्य आणि मूलभूत हक्कांचे संरक्षण केले आहे. त्यामुळे, न्यायव्यवस्थेवरील हल्ले दुर्दैवी आहेत. एससीबीएचे अध्यक्ष आणि ज्येष्ठ वकील प्रदीप रे यांनी असेही म्हटले की, अशा टिप्पण्यांमुळे सर्वोच्च न्यायालयावरील जनतेचा विश्वास डळमळू शकतो. यापूर्वी, ॲटर्नी जनरल आर. व्यंकटरमणी यांनी फौजदारी अवमान कारवाई सुरू करण्यास मंजुरी दिली होती.


**Format C-1**

**Declaration about criminal cases**

(As per the judgment dated 25th September, 2018, of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

Name and address of candidate : **Ghote Sushil Sureshrao**

Name of political party : Independent

Name of Election : 05 Aurangabad Division Graduates Constituency

*Name of Constituency: **MLC 05 Aurangabad Division Graduates Constituency**

I **Ghote Sushil Sureshrao,** a candidate for the above mentioned election, declare for public information the following details about my criminal antecedents:

(A) Pending criminal cases

| Sl. No. | Name of Court | Case No. And Dated | Status of Case(s) Trial | Section(s) of Acts concerned and Brife description of offence(s) |
|---|---|---|---|---|
| **1.** | **Honble CJM Latur** | **R C C 1516/2020 Dated 28/12/2020** | **Pending** | **IPC 465, 468, 201, 34** |

(B) Details about cases of conviction for criminal offences

| Sl.no. | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed. | Maximum Imposed Punishment |
|---|---|---|---|
| **1.** | **Honble J.M.F.C. Aurangabad Dated. 27/06/2024** | **Section 138 of N.I. Act Accused is Directed to pay 21,13,650/- Rs to the complainant in default to suffer simple imprisonment for 5 months.** | **simple imprisonment for 2 months: in default of payment of compensation, simple imprisonment for 5 months.** |

*ADDITIONAL DETAILS REGARDING APPEAL :- An appeal against the judgment of conviction dated 27/06/2024 passed by the Judicial Magistrate First Class, Court No. 20, Aurangabad, have been filed before the Court of District Judge-2 and Additional Sessions Judge, Aurangabad, bearing Criminal Appeal No. 168/2024. The appeal is pending for hearing.

*In the case of election to Council of States or election to Legislative Council by MLAs, mention the election concerned in place of name of constituency.



### टी.सी. हरवली

माझी **आर्तिका गंगाधरराव पावडे** या नावाची इयत्ता दहावी पास ची पावडेवाडी ते तरोडा नाका प्रवासादरम्यान हरवली आहे. कोणाला सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

**संपर्क**
**आर्तिका गंगाधरराव पावडे**
**रा. तरोडा नाका, नांदड**
**मो.नं. ८८३०६१८६५३**

### टी.सी. हरवली

माझी **शिरगिरे प्रणिता केरबा** या नावाची इयत्ता चौथी पास ची जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उंद्री प. दे येथील टि सी मुखेड ते वांजरवाडा प्रवासादरम्यान हरवली आहे. कोणाला सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

संपर्क
शिरगिरे प्रणिता केरबा
रा.उंद्री (प.दे) ता. मुखेड
जिल्हा नांदेड ९०१४७७४९४३

### कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लॅबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

### सनद हरवली आहे

माझी पवन नारायण ढेपे या नावाची इयत्ता दहावी पासची सनद मारतळा ते कापसी गुंफा बस प्रवासादरम्यान हरवली आहे. कोणास सापडली असल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी देणाऱ्यास येण्या-जाण्याचा खर्च व योग्य ते बक्षीस देण्यात येईल.

**संपर्काचा पत्ता**
**नारायण पाटील ढेपे निवास**
**मारतळा ता.लोहा मो.नं.७३८५९७२३४३**

### Change In Name

My old Name is **SABA KHANUM SHAIKH KHALEEL AHMED** Which now I am Changing as New Name **SABA KHANUM.** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

**Address: Sai Nagar, Near Famous Bakery, Itwara Nanded, Maharashtra 431604 Mo.No. 7385419448**



जाहीर प्रगटन

बिलोली येथील मा. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय बिलोली.

इतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र. १६९ / २०२६
वैजनाथ वि. मुख्याधिकारी नगर परीषद कुंडलवाडी.

वैजनाथ पि. दत्तराम ब्यागलवार
वय- २८ वर्षे, धंदा- शिक्षण,
रा. चिंचपाळा कल्याण जि. ठाणे
ह.मु. कुंडलवाडी, ता. बिलोली जि. नांदेड .. अर्जदार

विरुध्द

मुख्याधिकारी,
नगरपरीषद कुंडलवाडी,
ता. बिलोली.जि. नांदेड .. गैरअर्जदार

मागणी - जन्म/मृत्यू नोंदणी कायदा १९६९, कलम १३(३) व सुधारीत अधिनियम ३(अ) प्रमाणे जन्माची नोंद घेणेस आदेश करणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी जन्म / मृत्यूची नोंद सुधारणा कायदा २०२६, कलम ३(अ) प्रमाणे या न्यायालयात दाखल केला असुन अर्जदाराच्या आजोबाच्या मृत्युची नोंद घेणेसाठी गैरअर्जदार यांना आदेश करण्यात यावा म्हणुन या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदाराचे मृत वडील नामे रामलु पि. नरसिंमलू ब्यागलवार यांचा मृत्यू **दिनांक १८/०५/१९८३**, राहणार कुंडलवाडी, ता. बिलोली, जि. नांदेड येथे झाला असुन अर्जदाराने मृत्यूची नोंद घेण्यास गैरअर्जदारास कळविले नसल्याने सदरची नोंद होऊ शकली नसल्याने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

तरी अर्जदारास वरील आदेश देण्याकरिता कोणाचाही आक्षेप असल्यास किंवा तक्रार असल्यास ३० दिवसांचे आत वरील न्यायालयात स्वतः किंवा वकीलामार्फत आपले म्हणणे मांडावे. मुदत संपल्यानंतर गैरअर्जदारास अर्जदाराच्या मृत्यूची नोंदणी करणेचा आदेश दिला जाईल यांची संबंधितांनी नोंद घ्यावी. करिता हे जाहीर प्रगटन दिले आहे.

पुढील सुनावणीची तारीख **२१-११-२०२६** रोजी ठेवण्यात आली.

आज दिनांक १४-१०-२०२३ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

"आदेशावरून"
सहा. अधिक्षक



### जाहीर प्रगटन

मौजे कौठा ता. कंधार जि. नांदेड परिसरातील सर्व जनतेस कळविण्यात येते की, कौठा ता. कंधार जि. नांदेड येथील गट क्र. ७७७ मधील ३७ आर शेतजमीन ज्याची चतुः सिमा पूर्वेस - नांदेड - बिदर महामार्ग, पश्चिमेस - जयश्री बालाजी बिडवे यांची जमिन, दक्षिणेस - शिवराज विठ्ठल कापसे यांची जमिन व उत्तरेस - जयश्री बालाजी बिडवे यांची जमीन.

सदरील जमीन ही माझ्या मालकीची व ताब्यात असून ही जमीन कोणालाही हिश्याने, भाड्याने किंवा इतर कोणत्याही प्रकारे कसण्यास दिलेली नाही. कोणाच्याही सांगण्यावरून माझ्या परवानगीशिवाय माझ्या शेतात कोणीही जेसीबी, ट्रॅक्टर, बैल, औत किंवा इतर साधनाने मशागत करू नये, किंवा पेरणी करू नये. माझ्या शेतात माझ्या परवानगीशिवाय कोणतेही काम करू नये. परवानगीशिवाय कोणतेही काम केलेले आढळल्यास तसे करणाऱ्याविरूद्ध कडक कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

करीता हे जाहीर प्रगटन

**जाहीर प्रगटन देणार**
**महानंदा शिवानंद बिडवे**
**रा. जुना कौठा नांदेड**
**मो.नं. ९७३०५४१२५१**



### श्रीमती इंदिरा गांधी अध्यापक महाविद्यालय वसरणी, नांदेड.

पत्ता: डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, (लातुर फाटा) जवळ नांदेड-लातुर रोड वसरणी, नांदेड. ४३१६०३

बी. एड. प्रथम वर्ष – २०२६-२७

संस्थात्मक प्रवेश फेरी (Institute Level Round)

विद्यार्थ्यांनी CET CELL वर या फेरी साठी option form भरून वर उल्लेखलेल्या महाविद्यालयाचा पर्याय निवडावा.

प्रवेश घेण्याच्या महत्वाच्या तारखा खालील प्रमाणे

| अनु. | प्रवेशाचे टप्पे | दिनांक |
|---|---|---|
| | रिक्त जागा दर्शवणे | १४/१०/२०२६ |
| १ | CETCELL वरून पर्याय निवडणे | १५/१०/२०२६ ते १७/१०/२०२६ |
| २ | गुणवत्ता यादी प्रसिद्ध करणे | १९/१०/२०२६ |
| ३ | विद्यार्थ्यांनी मूळ शैक्षणिक कागदपत्रांसह महाविद्यालयात येऊन प्रवेश निश्चित करणे | २१/१०/२०२६ ते २३/१०/२०२६ |

नोट: वरील प्रवेश प्रक्रिया पूर्वीच्या फेरी प्रमाणेच online होईल, विद्यार्थ्यांचा प्रवेश त्यांचे गुण, विषय, जात-प्रवर्ग, विद्यापीठ कोटा इत्यादी बाबीवरून गुणवत्ता यादी नुसार होतील. प्रवेश समयी अनुपस्थित विद्यार्थ्या व कागदपत्रांची कमतरता असलेल्या (काही सवलत देण्यासारखे आयोगाने ठरवेले कागदपत्र वगळून ) विद्यार्थ्यांचा प्रवेशासाठी विचार केला जाणार नाही.

अधिक माहिती साठी संपर्क

**प्राचार्य. डॉ. टेकाळे एस.एस. ९४२३३४२९८६**



### रामानंदनगर सहकारी गृहनिर्माण संस्था म. रामानंदनगर, नांदेड.

नोंदणी क. एन.एन.डी./एच.एस.जी./१००१ दि. १८/०७/१९८०

विशेष सर्वसाधारण सभेची सुचना

(फक्त सभासदांसाठी)

दि. १७/१०/२०२६

स.न.वि.वि.

रामानंदनगर सहकारी गृहनिर्माण संस्था म. रामानंदनगर संस्थेच्या सभासदांनी केलेल्या मागणी नुसार विशेष सर्वसाधारण सभा संस्थेचे कार्यालय रामानंदनगर येथे रविवार दि. २५/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ. एम. एन. देशपांडे यांच्या अध्यक्षते खाली बोलावण्यात आली आहे. सभागृहासमोर खालील विषय चर्चेसाठी व निर्णयासाठी ठेवले आहेत. तरी सर्व सभासदांनी सभेस उपस्थित राहुन सभेच्या कामकाजात भाग घ्यावा, ही विनंती.

:- विषय सुची-:

१) मुद्रांक शुल्क / कन्व्हेन्स डिडसाठी / सातबारा नोंदीसाठी, सभासदांनी खर्च केलेली रक्कम सभासदांच्या मागणीनुसार सम प्रमणात वितरीत करणे बाबत.

२) आयत्यावेळी आलेल्या विषय मा. अध्यक्षांच्या परवानगीने चर्चेस घेतले जातील.

-: नोट :-

१) सभेसाठी फक्त प्लॉटधारक सभासदांनाच सभागृहात प्रवेश असेल.

२) गणपुर्ती अभावी सभा तहकुब झाल्यास ती सभा वरील दर्शविलेल्या विषयावर त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल. त्यासाठी गणपुर्तीची आवश्यकता राहणार नाही.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार

सचिव
श्री एस. बी. छाप्परवाल
रामानंदनगर सहकारी गृहनिर्माण संस्था म. नांदेड.

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



### वाहेगावात वाळू तस्करीवर पोलिसांची कारवाई

## ७ परप्रांतीय मजूर जेरबंद, २.२९ कोटींचा मुद्देमाल जप्त;४ मुख्य सूत्रधारांवर गुन्हा दाखल



**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील वाळू माफियांना धडा शिकवण्यासाठी नांदेड पोलिसांनी आतापर्यंतची सर्वात मोठी कारवाई केली आहे. वाहेगाव (ता. नांदेड) येथे गोदावरी नदीपात्रात सुरू असलेल्या अवैध रेती उपसा अड्ड्यावर स्थानिक गुन्हे शाखा, नांदेड ग्रामीण पोलिस आणि महसूल विभागाने संयुक्त छापा टाकून २ कोटी २९ लाख २० हजार रुपयांचे बोटी, इंजिन, तराफे जप्त करून जागीच नष्ट केले आहेत. पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशानुसार सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत ही कारवाई करण्यात आली.

शुक्रवार दिनांक १६ आक्टोबर रोजी सकाळी तहसिलदार संजय वारकड, एलसीबीचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले व ग्रामीणचे पीआय अशोक जाधव यांचे पथक पेट्रोलिंगवर असताना वाहेगाव येथे बोटी व इंजिनच्या साहाय्याने रेती उपसा सुरू असल्याची गुप्त माहिती मिळाली. पोलिसांनी पंचांसह छापा मारताच पळून जाणाऱ्या ७ परप्रांतीय मजुरांना शिताफीने पकडले. हे सर्वजण कल्लाळ व भनगी येथील ४ मुख्य सूत्रधारांच्या सांगण्यावरून काम करत होते.

पथकाने ५ मोठ्या लोखंडी बोटी (३० लाख प्रत्येकी) १.५० कोटी रु. (जिलेटीनने ब्लास्ट करून नष्ट), ३ छोट्या बोटी (१५ लाख प्रत्येकी) – ४५ लाख रु., ३ इंजिन – १०.५० लाख रु., ३७ तराफे व ७४ ब्रास रेती – २२.२० लाख रु. (जाळून व बुडवून नष्ट), किनाऱ्यावर साठवलेली ३० ब्रास रेती – १.५० लाख असा एकूण – २ कोटी २९ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल काही जप्त तर काही नष्ट करण्यात आला.

ताब्यात घेतलेले मजूरामध्ये अल्लाऊद्दीन शेख दुख शेख (३७, झारखंड), खदीर शेख जुल्लु शेख (३४, झारखंड), अब्दुल वाहेद शेख (३३, झारखंड), अखिलेश कुमार राम (३६, बिहार), उमेशकुमार राम (२५, बिहार), सुनिलकुमार राम, शैलेशकुमार राम (सर्व बिहार/झारखंड), मुख्य आरोपी (मालक), मधुकर कळके (कल्लाळ), बालाजी कळके (कल्लाळ), पवन मोरे (भनगी) आणि अनिल मोरे (भनगी) यांच्याविरुद्ध नांदेड ग्रामीण पोलीस ठाणे गु.र.नं. १३४३/२०२६ व १३४४/२०२६ कलम ३०३(२), ३(५) BNS सह महाराष्ट्र जमीन महसूल संहिता कलम ४८(७)(८), पर्यावरण संरक्षण अधिनियम व सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली पीआय भोसले, पीआय जाधव, एपीआय रवी वाहूळे, विठ्ठल घोगरे, पीएसआय साईनाथ पुयड, चव्हाण, दासरे व अंमलदार, तलाठी रमेश गिरी, श्री भिसे यांच्यासह आदींने केली.

## आ. सतीश चव्हाण यांच्या प्रचारार्थ उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची आज जाहीर सभा



**नांदेड (प्रतिनिधी)–** मराठवाडा पदवीधर विधानपरिषद मतदारसंघ निवडणुकीतील राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप-शिवसेना महायुतीचे उमेदवार आ. सतीश चव्हाण यांच्या प्रचारार्थ राज्याच्या उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा पवार यांची जाहीर सभा शनिवार दि. १७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी साडेचार वाजता कै. शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह येथे आयोजित करण्यात आली आहे.

या जाहीर सभेच्या अध्यक्षस्थानी राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खा. अशोकराव चव्हाण हे राहणार आहेत. राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, नांदेडचे पालकमंत्री अतुल सावे, राज्याच्या आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून खा.डॉ. अजित गोपछडे, खा. नागेश पाटील आष्टीकर, आ. हेमंत पाटील, माजी मंत्री डी.पी. सावंत, आ. भीमराव केराम, आ.डॉ. तुषार राठोड, आ. राजेश पवार, आ. जितेश अंतापूरकर, आ.बालाजी कल्याणकर, आ.श्रीजया चव्हाण, आ. आनंदराव बोंढारकर, आ. बाबुराव कदम कोहळीकर, महापौर कविता मुळे यांच्यासह इतर मान्यंवर उपस्थित राहणार आहेत. या जाहीर सभेला महायुतीच्या सर्व पदाधिकारी कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन सभेच्या संयोजकांनी केले आहे.

## आदमपूरमध्ये जुगार अड्ड्यावर धाड; २३ जुगारी जाळ्यात, ८.७६ लाखांचा ऐवज जप्त



**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात अवैध धंद्यांविरुद्ध सुरू असलेल्या विशेष मोहिमेंतर्गत रामतीर्थ पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. आदमपूर (ता. बिलोली) येथे पहाटेच्या सुमारास सुरू असलेल्या तिर्रट जुगार अड्ड्यावर छापा टाकून २३ जुगाऱ्यांना रंगेहाथ पकडले असून त्यांच्याकडून ८ लाख ७६ हजार ६५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली.

दि. १६ ऑक्टोबर रोजी पहाटे सपोनि विक्रम हराळे यांचे पथक आदमपूर फाट्यावर पेट्रोलिंग करत असताना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, आदमपूर गावात मोकळ्या जागेत काही इसम गोलाकार बसून पैशांवर तिर्रट जुगार खेळत आहेत. माहितीच्या आधारे दोन पंचांसह पोलिसांनी छापा मारून २३ जणांना ताब्यात घेतले.

पोलिसांनी घटनास्थळावरून रोख रक्कम ४१ हजार, विविध कंपन्यांचे २१ मोबाईल, पुढील क्रमांकाच्या दुचाकी (MH-26-BY-9673, MH-26-CB-2351, MH-26-BH-2247, K-38-2077, MH-26-BT-9773, MH-26-BZ-9287, MH-24-V-3857, MH-26-DB-3560, MH-24-L-2576) आणि जुगाराचे साहित्य असा एकूण किंमत ८ लाख ७६ हजार ६५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी २३ आरोपींविरुद्ध रामतीर्थ पोलीस ठाणे गु.र.नं. २२१/२०२६ कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपींमध्ये मस्तान शेख, साहेबराव गायकवाड, तानाजी पिटलेवाड, मल्लिकार्जुन पोलकमवाड, कमलाकर मंगरुळे, मारोती कुमठे, शिवदास इंगळे, आकाश डोम्पे, सिद्धार्थ भुरे, शिवाजी हालबुर्गे, मुसा शेख, तानाजी कोकणे, इरन्ना चोंडे, शंकर कोळणे, नागेश मठपती, शिवशंकर रेजीतवाड, बसवेश्वर मुंगळे, हलबा चितले, दीपक नरवाडे, बालाजी इंगळे, अनिल चिगळे, अरविंद सर्जे, नारायण पिनलवार (सर्व रा. बिलोली तालुका) यांचा समावेश आहे.

ही कारवाई अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव, एसडीपीओ शाम पानेगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि विक्रम हराळे, अंमलदार शेख मुक्तार, अनिल रिंदकवाले, बेळेकर, येरवलवाड व होमगार्ड पथकाने केली.



**नांदेड –** ‘समान काम समान वेतन’ या मागणीसाठी नांदेड जिल्हा न्यायालयातील कर्मचारी काळ्या फिती लावून निषेध व्यक्त केला.

## ‘समान काम, समान वेतन’च्या मागणीसाठी हदगाव व मुदखेड न्यायालयीन कर्मचाऱ्यांचे काळ्या फिती लावून आंदोलन




**हदगाव (प्रतिनिधी)–** उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांच्या समकक्ष वेतनश्रेणी लागू करावी, या प्रमुख मागणीसाठी हदगाव व मुदखेड येथील न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर रोजी काळ्या फिती लावून कामकाज करत शासनाचा निषेध नोंदविला.

‘समान काम, समान वेतन’ या मागणीसाठी राज्यातील न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाचा दुसरा टप्पा सुरू झाला आहे. या आंदोलनांतर्गत कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून नियमित कामकाज करत शासनाचे लक्ष प्रलंबित मागण्यांकडे वेधले. उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणे दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांनाही समकक्ष वेतनश्रेणी लागू करावी, अशी कर्मचाऱ्यांची प्रमुख मागणी आहे. या मागणीवर शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी घेतली आहे. या आंदोलनात नांदेड जिल्हा न्यायालयीन तृतीय श्रेणी कर्मचारी संघटनेचे एन. एस. गिरगावकर, विनोद पाथरकर एस. पी. कोटगीरे आदींनी सहभागाबाबत आवाहन केले आहे.

## आकडे टाकून वीज चोरी; लोह्यात आठ जणांविरुध्द गुन्हे दाखल



**नांदेड (प्रतिनिधी)–** महावितरणच्या नांदेड परिमंडलात अनधिकृत वीज वापरकर्त्यांविरुध्द महावितरणने धडक मोहिम सुरु केलेली आहे. वीज चोरीसाठी वापरण्यात येणारे केबल, शेगड्या, हिटर्स जप्त करण्यात येत असून पोलीसांत गुन्हेही दाखल करण्यात येत आहेत. लोहा शहरात थकबाकीपोटी वीज पुरवठा खंडित केलेल्या सात ग्राहकांसह अन्य एकाने वाहिनीवर परस्पर आकडे टाकून वीजचोरी केल्याचे महावितरणच्या तपासणी माहिमेत आढळून आले. त्यांच्याविरुध्द लोहा पोलीस ठाण्यात बुधवारी (दि. १४ ऑक्टोबर) गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

लोहा शहरातील इंदिरा नगर भागातील वीज ग्राहक नामदेव लिंबाजी लोंढे, ज्ञानेश्वर रुखमाजी दाभाडे, उत्तम रामराव ससाणे, केशव भीमाशंकर वाघमारे, सरुबाई राजकुमार संगेवार, मारोती सदाशिव फुलपगार आणि नंदाबाई वसंतराव गायकवाड यांच्याकडे महावितरणच्या वीज देयकांची एकूण ३४६०० रुपयांची थकबाकी होती. थकबाकी न भरल्याने महावितरणकडून त्यांचा नियमानुसार वीज पुरवठा खंडित केलेला होता, परंतु त्यानी थकबाकीची रक्कम न भरता परस्पर वीज वाहिनीवर केबलच्या सहायाने आकडे टाकून एकूण १,०४,६५० रुपयांची चोरी केल्याचे तपासात आढळून आले.

## विद्यार्थी संसदेच्या निवडणुकांबाबत उच्चस्तरीय समितीची आज स्वारातीम विद्यापीठात बैठक

**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्यातील विद्यापीठे व महाविद्यालयांमधील विद्यार्थी संसदेच्या निवडणुकांबाबत आढावा घेण्यासाठी शासनाने नियुक्त केलेली उच्चस्तरीय समिती शनिवार, दि. १७ ऑक्टोबर रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाला भेट देणार आहे. या भेटीदरम्यान समिती विद्यार्थी संसदेच्या निवडणुकांबाबत विविध घटकांची मते जाणून घेणार आहे.

माजी कुलगुरू डॉ. सुहास पेडणेकर यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या या बारा सदस्यीय समितीवर विद्यार्थी परिषद निवडणुकांच्या अंमलबजावणीतील आव्हानांचा अभ्यास करणे, संबंधित घटकांशी चर्चा करणे आणि निवडणुका निकोप व विद्यार्थी-केंद्रित वातावरणात पार पाडण्यासाठी पुढील दिशा निश्चित करण्याची जबाबदारी आहे. समिती राज्यातील विविध विद्यापीठांना भेटी देऊन आपला अहवाल शासनाला सादर करणार आहे.

विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात दुपारी १२:३० वा. कार्यक्रम होणार आहे. विद्यार्थी संसदेच्या निवडणुकांबाबत आपली मते व सूचना मांडण्यासाठी विद्यार्थी, पालक, प्राध्यापक, प्राचार्य, विभागप्रमुख, पदवीधर अधिसभा सदस्य आणि व्यवस्थापन परिषद सदस्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. पवार यांनी केले आहे.

## नांदेडमध्ये कॅरमच्या आड मटका! इतवारा पोलिसांची ‘गुडलक’वर धाड; ६ जुगारी जेरबंद, २२ हजारांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरात कॅरम क्लबच्या नावाखाली सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर इतवारा पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने छापा टाकून मोठी कारवाई केली आहे. सिटीझन गल्लीतील ‘गुडलक कॅरम क्लब’ येथे सुरू असलेल्या मटका-जुगारावर पोलिसांनी गुरुवारी सायंकाळी ५ वाजता धाड टाकली.

या कारवाईत पोलिसांनी रोख रक्कम व ३ मोबाईल असा एकूण २२ हजार ७७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून ६ जणांविरुद्ध गु.र.नं. ३४२/२०२६ कलम ४(१)(ब), ५ महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून क्लब चालक आणि जागा मालकालाही आरोपी करण्यात आले आहे.

आरोपींमध्ये शेख फिरोज शेख शौकत (वय ४२, रा. पाकीजानगर, नांदेड), मोहम्मद मुजमील मोहम्मद छोटे मियाँ (वय ४२, रा. ब्रह्मपुरी चौफाळा), मोहम्मद नदीम मोहम्मद नूर (वय २६, रा. बागवान कॉलनी, देगलूर नाका), मोहम्मद हर्षद मोहम्मद अहमदमियाँ (वय ३८, रा. सिद्धनाथपुरी चौफाळा), मोहम्मद अस्लम मोहम्मद अहमद मियाँ (वय ३६, रा. सिद्धनाथपुरी चौफाळा) आणि ९७ ६३ ३६ ५० ९३ या मोबाईल क्रमांक धारकाचा समावेश आहे.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन आणि उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे यांच्या आदेशावरून इतवारा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सिध्देश्वर कैलासे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक जळबाजी गायकवाड आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केली.

## नांदेड विभागात आरपीएफकडून केबल चोर जेरबंद, ६ लाखांच्या सोने चोरीचा छडा

**नांदेड (प्रतिनिधी)–** दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागात प्रवासी व रेल्वे मालमत्तेच्या सुरक्षेसाठी ‘ऑपरेशन रेल सुरक्षा’ आणि ‘ऑपरेशन यात्री सुरक्षा’ अंतर्गत विशेष मोहीम राबविण्यात आली असून दोन कारवाया करण्यात आल्या आहेत.

दि. १४ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ४ वाजता अकोला रेल्वे स्थानकासमोर ST डेपो परिसरात संशयित हालचालींची माहिती मिळताच आरपीएफच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक व कॉन्स्टेबल यांनी धाव घेऊन एकाला ताब्यात घेतले.

त्याच्याकडे १३.१८ मीटर ६ टींरव सिग्नल केबल आढळली. त्याने डेपोतील ड्रममधून केबल कापून भंगारात विकण्याचा प्रयत्न केल्याची कबुली दिली. आरोपीचे नाव दाऊद खान, रा. अकोला असे असून त्याच्याविरुद्ध रेल्वे संपत्ती कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि. ८ ऑक्टोबर रोजी पहाटे १.१० वा. अजंठा एक्स्प्रेसमधून ८० ग्रॅम सोन्याचे मंगळसूत्र, साखळी व ६ हजार रोख असा एकूण ६.०६ लाख रुपयांचा ऐवज होता. पोलिसांनी दि. १५ ऑक्टोबर रोजी सायं. ६ वा. बसमत येथील बुधवारपेठ, बागल हॉस्पिटलजवळ सापळा रचून रुपेश (वय २०, रा. वसमत, जि. हिंगोली) याला ताब्यात घेतले.

## अथर्व नीलपत्रेवार याचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील कौठा गोवर्धनघाटरामसेतू पुलानजीकच्या विजयनगर मधील रहिवासी अथर्व बालाजी नीलपत्रेवार या १७ वर्षीय तरुणाचे गुरुवारी दि. १५ ऑक्टोबर रोजी आकस्मिक निधन झाले.

त्याच्या पार्थिवावर शुक्रवार दि. १६ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता शांतीधाम स्मशानभूमी गोवर्धनघाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. या घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.



**नांदेड –** जय माता दी नवरात्र दुर्गा महोत्सव कल्याणनगर येथील श्री दुर्गा मातेची आरती राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खा. अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी महानगराध्यक्ष आ. अमरनाथ राजूरकर, महापौर सौ. कविता मुळे, जयश्री पावडे, उमेश पवळे, सतीष देशमुख, अमितसिंह तेहरा, निलेश पावडे, संतोष मुळे, शशिकांत क्षीरसागर तसेच नागरिक उपस्थित होते. **(छाया : करणसिंह बैस)**

## नांदेड परिक्षेत्रात अवैध धंद्यांवर पोलिसांची कारवाई; १५ दिवसांत ९९८ जणांवर गुन्हे, २४ कोटींचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड परिक्षेत्रात १ ते ३१ ऑक्टोबर दरम्यान ‘अवैध व्यवसाय निर्मूलन मोहीम-४’ राबविण्यात येत असून पहिल्या पंधरवड्यातच पोलिसांनी दणका दिला आहे.

दि. १ ते १५ ऑक्टोबर या पंधरवड्यात परिक्षेत्रात एकूण ७४८ गुन्हे दाखल करून ९९८ इसमांविरुद्ध कारवाई करण्यात आली असून २४ कोटी ३६ लाख ६ हजार ८८७ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

गुटखा: ११ गुन्हे, २६.९१ लाखांचा मुद्देमाल, १४ आरोपी. मटका-जुगार: १२१ गुन्हे, १६.८४ लाखांचा मुद्देमाल, १४२ आरोपी. अवैध दारू: ४५४ गुन्हे, ४१.९३ लाखांचा मुद्देमाल, ४५८ आरोपी. शस्त्र अधिनियम: १८ गुन्हे, ७८,१०० रुपयांचा मुद्देमाल, २१ आरोपी. इतर (वाळू इ.): १४४ गुन्हे, २३.४९ कोटींचा मुद्देमाल, २०७ आरोपी. या मोहिमेत DIG कार्यालयाच्या विशेष पथकाने नांदेडच्या मुदखेड येथे वाळू तस्करी, हिंगोलीतील औंढा नागनाथ व लातूरच्या अहमदपूर येथे गुटखा, तर लातूरच्या गांधी चौक, निलंगा व अहमदपूर येथे मटका-जुगारावर धडक कारवाई केली.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com